




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २६८ * नांदेड * गुरुवार, दि. ८ ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# सलग दुसऱ्या दिवशी राहुल गांधी पोलिसांच्या ताब्यात

## ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी विरोधक पुन्हा आक्रमक



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आक्रमक झालेले काँग्रेस नेते राहुल गांधी यांना पुन्हा एकदा दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. राहुल गांधी हे इंडिया आघाडीच्या जवळपास २०० खासदारांसह दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर आंदोलनासाठी जात असताना पोलिसांनी त्यांना अडवलं आणि ताब्यात घेतलं आहे. त्याचसोबत आंदोलन करणाऱ्या प्रियंका गांधींनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी देशाची लोकशाही धोक्यात आणली असून त्यांना राजीनामा द्यावाच लागेल, असा इशारा राहुल गांधी यांनी दिला आहे.

मंगळवारी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा काढला. त्यावेळी त्यांना दिल्ली पोलिसांनी अडवलं. राहुल गांधी यांनी तब्बल ८ तास आकाशवाणी भवनवर ठिय्या मांडला. त्यानंतर रात्रीच्या वेळी दिल्ली पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं होतं.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निवासस्थानी इंडिया आघाडीच्या खासदारांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर हे सर्व खासदार तीन बस भरून दिल्लीच्या जंतरमंतर मैदानाकडे निघाले. परंतु या मैदानापासून १०० मीटर अंतरावरच पोलिसांनी या बस अडवल्या.

पोलिसांनी राहुल गांधींना आंदोलन करण्यापासून अटकाव केल्यानंतर राहुल गांधींनी त्याच ठिकाणी ठिय्या मांडला. प्रियंका गांधीही यावेळी रस्त्यावर आडव्या पडल्या. पोलिसांनी आपल्यासह इतर खासदारांना मारहाण केल्याचा आरोपही त्यांनी केला.

गेल्या दोन दिवसांपासून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी इंडिया आघाडीचे खासदार आक्रमक झाले आहेत. राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढत त्यांनी ज्ञानेश कुमार आणि इतर आयुक्तांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पोलिसांनीही राहुल गांधी यांना गेल्या २४ तासांमध्ये दुसऱ्यांदा ताब्यात घेतल्याचं चित्र आहे.

# हिंगोली हादरलं: पेट्रोल पंपाचा ताबा घेण्यासाठी गेलेल्या अधिकाऱ्याचा चाकूने भोसकून खून

**हिंगोली (प्रतिनिधी)–** पेट्रोल पंपाचा ताबा घेण्यासाठी गेलेल्या इंडियन ऑईलच्या अधिकाऱ्यावर धारदार शस्त्राने हल्ला करून खून केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना चोंढी येथील पेट्रोल पंपावर घडली.

ताबा घेण्यावरून झालेला वाद इतका विकोपाला गेला की, पंप मालक आणि त्याच्या मुलाने कंपनीचे व्यवस्थापक महेश शेळके यांच्यावर हल्ला केल्याची माहिती आहे. हल्ल्यानंतर अधिकाऱ्याचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. इंडियन ऑइल कंपनीचे व्यवस्थापक महेश शेळके हे चोंढी येथील पेट्रोल पंपाचा ताबा घेण्यासाठी त्यांच्या पथकासह गेले होते. यावेळी पेट्रोल पंपाचा ताबा घेण्यावरून कंपनीच्या पथकाची पंप मालकाशी बाचाबाची झाली. वाद वाढल्यानंतर पंप मालक आणि त्याच्या मुलाने महेश शेळके यांच्यावर हल्ला केल्याचं सांगितलं जातंय. धारदार शस्त्राने शेळके यांच्यावर वार करण्यात आले. हा हल्ला पेट्रोल पंपाच्या बाहेर झाल्याची माहिती आहे. गंभीर जखमी झालेल्या शेळके यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

या प्रकरणी कुरुंदा पोलीस ठाण्यात पाच आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे. हल्ल्याचं नेमकं कारण आणि घटनेमागील इतर बाबींचा तपास केला जात आहे.

# पुण्यासह नांदेडच्या परीक्षा केंद्रांवर पुन्हा परीक्षा होणार

## महाज्योती अन् वनार्टी संस्थेमार्फत स्पष्टीकरण; अहवालानंतर दोषींवर कारवाईचीही ग्वाही

**पुणे (प्रतिनिधी)–** महाज्योती आणि वनार्टी संस्थेमार्फत घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण पूर्व परीक्षा पुन्हा घेण्यात येणार आहेत. पुणे व नांदेड येथील परीक्षा केंद्रांवर ह्या परीक्षा घेण्यात येणार असल्याची माहिती महाज्योती अन् वनार्टी संस्थेमार्फत देण्यात आली आहे.

महाज्योती आणि वनार्टी संस्थेमार्फत घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण पूर्व परीक्षेसाठी तीन दिवस ६४ केंद्रावर परीक्षा घेतली जात आहे. यासाठी ९० हजार ६०० विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी आज अर्ज केले. मात्र बुधवारी पहिल्या दिवशी ३० हजार विद्यार्थी परीक्षा सुरु असतांना सनराईज आंबेगाव पुणे आणि नांदेडच्या मराठवाडा ऑनलाईन या परीक्षा केंद्रावर तांत्रिक अडचण आल्यामुळे परीक्षा रद्द करण्यात आली. यूपीएससी, एमपीएससी, पोलीस भरती यासाठी जे आमचं प्रशिक्षण घेतलं जातं, त्या प्रशिक्षणासाठी ही निवड परीक्षा होती. परिणामी आता नवीन तारीख आणि नवीन वेळ लवकरच विद्यार्थ्यांना कळविण्यात येईल, असे स्पष्टीकरण महाज्योती आणि वनार्टी संस्थेमार्फत देण्यात आले आहे. महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे आणि वनार्टीचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांनी एकत्रित पत्रकार परिषद घेत यासंदर्भात माहिती दिली आहे.

दरम्यान, परीक्षेवेळी तांत्रिक अडचण होती आणि त्यासंदर्भात अहवाल मागितलेला आहे. अहवालात नेमकी काय तांत्रिक अडचण आली, हे कळेल. शिवाय कोणी दोषी आढळल्यास कारवाई केली जाईल, असेही यावेळी सांगण्यात आले.

दरम्यान, नव्याने परीक्षा केवळ त्याच विद्यार्थ्यांसाठी होईल, नवीन सेंटर आम्ही आयडेंटिफाय करतोय आणि लवकरच विद्यार्थ्यांना त्याबाबत कळवण्यात येईल. या सेंटरवर तीनशे विद्यार्थी होते, त्या विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेतली जाईल. तर पुणे केंद्रावर लॉगिंग होत नव्हते, तर तिकडे नांदेडमधील सेंटरवर वीज गेल्याने ट्रिप झाली होती. त्यामुळे दोन्ही केंद्रावर पुन्हा परीक्षा घेणार असल्याचे महाज्योती आणि वनार्टी संस्थेमार्फत सांगण्यात आलं आहे. तर नव्याने घेण्यात येणाऱ्या या परीक्षेसाठी कुठलेही परीक्षा शुल्क आकारलेजाणारनाही, अशीदेखील माहिती देण्यात आली आहे.

परीक्षेसाठी ९० हजार ६०० विद्यार्थ्यांनी अर्ज केलेला आहे, त्यासाठी ही परीक्षा घेण्यात आली होती. ३२ शहरांमध्ये ६४ सेंटरवर ही परीक्षा आयोजित करण्यात आली होती. बाकी इतर सर्व सेंटर सुरळीत पार पडली आहे. या सेंटरवरच्या सर्व विद्यार्थ्यांची सुविधेनुसार पुढची डेट आणि सेंटर आजच सांगणार आहोत. विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रवासाची अडचण येणार नाही. तसेच यानंतरचे सगळे सेंटर हे सुद्धा सेंटर तपासून घेतले होते. पण तांत्रिक अडचण आली. मात्रयापुढे आम्ही याची खबरदारी घेऊ असे देखील महाज्योती आणि वनार्टी

# ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र देण्यास विलंब; महसूल सहायक व सहायक महसूल अधिकारी निलंबित

## शासकीय कामकाजात दिरंगाई व निष्काळजीपणाबद्दल जिल्हाधिकाऱ्यांची कठोर कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** आर्थिक दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) प्रमाणपत्र निर्गमित करण्यास विनाकारण विलंब केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी कठोर कारवाई केली आहे. बिलोली तहसील कार्यालयातील महसूल सहायक सी.पी. धर्मेकर आणि सहायक महसूल अधिकारी एन.व्ही. पाळेकर यांना तातडीने सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

बिलोली तालुक्यातील आदमपूर येथील रहिवासी कार्तिक काशिनाथ पांडे यांनी दि. २८ जून २०२६ रोजी महाऑनलाईन प्रणालीद्वारे ईडब्ल्यूएस प्रमाणपत्रासाठी अर्ज केला होता. मागणी केलेले प्रमाणपत्र विहित मुदतीत देणे बंधनकारक असतानाही संबंधितांकडून त्यास विलंब झाला. त्यानंतर दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले.

प्रमाणपत्र देण्यास विनाकारण विलंब करून शासकीय कामकाजात दिरंगाई व निष्काळजीपणा केल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित महसूल सहायक व सहायक महसूल अधिकारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे.

शासकीय सेवा व विविध प्रमाणपत्रांच्या कामकाजात नागरिकांना अनावश्यक विलंब होऊ नये, यासाठी संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विहित कालमर्यादेत कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले आहेत. शासकीय कामकाजात दिरंगाई अथवा निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांविरुद्ध यापुढेही नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# राज्यातील आंदोलने म्हणजे केवळ 'विरोधाला विरोध'–खा. अशोकराव चव्हाण

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राजकारण न करण्याचे आवाहन



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यभर विविध प्रश्नांवर सुरू असलेली आंदोलने ही जनहिताच्या भावनेतून नव्हे, तर केवळ राजकीय द्वेष आणि 'विरोधाला विरोध' या भूमिकेतून केली जात असल्याचा आरोप भाजपचे राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांनी केला. देश आणि राज्यात अनावश्यक अराजकता निर्माण करण्याचा विरोधकांचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी म्हटले.

रोहित पवार यांच्यासह विविध विरोधी पक्षांच्या नेत्यांकडून विविध प्रश्नांवर आंदोलने केली जात आहेत. या पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया देताना खा. चव्हाण यांनी केंद्र आणि राज्य सरकार संबंधित प्रश्नांवर गांभीर्याने काम करीत असल्याचे स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार तसेच राज्य सरकार संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, आवश्यक त्या प्रकरणांमध्ये उच्चस्तरीय चौकशी आणि कायदेशीर कारवाई सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात दुष्काळासारखे गंभीर संकट उभे असताना राजकीय फायद्यासाठी आंदोलने करणे दुर्दैवी असल्याची टीकाही त्यांनी केली.

मतदार यादीच्या शुद्धीकरणासाठी सुरू असलेल्या विशेष प्रक्रियेबाबतही त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला. मृत मतदारांची तसेच दुबार नोंद असलेली नावे कायद्यानुसार वगळण्याचे काम सुरू आहे. या प्रक्रियेत संबंधित यंत्रणा आणि सर्वपक्षीय प्रतिनिधींचा सहभाग असतानाही जनतेमध्ये चुकीचा समज निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

पेपरफुटीच्या घटनांबाबत सरकारची भूमिका स्पष्ट असल्याचे सांगत, ज्या ठिकाणी गैरप्रकार आढळले आहेत, तेथे कठोर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. परीक्षा व्यवस्था अधिक पारदर्शक आणि सक्षम करण्यासाठी यंत्रणेतील त्रुटी दूर केल्या जातील. विरोधकांनी केवळ राजकीय विरोध न करता जनहिताच्या प्रश्नांवर रचनात्मक भूमिका घ्यावी, असे आवाहन चव्हाण यांनी केले.

# नांदेड पोलीस दलात फेरबदल; नांदेड ग्रामीण, विमानतळ, अर्धापूर, मुदखेडसह ६ 'पीआय'ची बदली

## चिंचोलकर, मांजरमकर, जाधवर, भगत आदींचा समावेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या कार्यालयाकडून दि. ६ ऑक्टोबर रोजी याबाबत अधिकृत आदेश जारी करण्यात आला असून जिल्ह्यातील ६ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी आणि प्रशासकीय कामकाज गतिमान करण्यासाठी हे बदल करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

बदल्या झालेल्यांमध्ये पोलीस निरीक्षक सुभाष उन्हाळे- विमानतळ सुरक्षा विभागातून नायगाव, पो.नि. अमोल भगत- नायगाव पोलीस ठाण्यातून अर्धापूर पोलीस ठाणे, पो.नि. महादेव मांजरमकर- अर्धापूर पोलीस ठाण्यातून विमानतळ सुरक्षा विभाग, पो.नि. ओमकांत चिंचोलकर- नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यातून नियंत्रण कक्ष, नांदेड, पो.नि. अशोक जाधव- नियंत्रण कक्षातून नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे आणि पो.नि. गणेश कराड- मुदखेड पोलीस ठाण्याचे नवे प्रमुख तर मुदखेडचे धीरज चव्हाण यांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे.

बदली झालेल्या सर्व पोलीस निरीक्षकांनी विनाविलंब आपल्या नवीन पदस्थापनेचा कार्यभार स्वीकारावा आणि कार्यभार स्वीकारल्यानंतर तात्काळ अनुपालन अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करावा, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

नांदेड ग्रामीण ठाण्याचा दोन वर्षांपूर्वी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी पदभार घेतल्यानंतर त्यांनी या भागातील वाळू माफिया विरुद्ध जवळपास १७६ कारवाया करून ८६ कोटींचा मुद्देमाल जप्त केला. दोन वर्षांत त्यांनी ४२ जणांविरुद्ध एनपीडीएअंतर्गत कारवाई केली. नांदेड ग्रामीणह नायगाव, अर्धापूर, मुदखेड, नियंत्रण कक्ष आणि विमानतळ सुरक्षा या महत्त्वाच्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांमध्ये फेरबदल झाल्याने जिल्ह्यात पोलीस प्रशासनाचा नवा चेहरा पाहायला मिळणार आहे.

# 'ज्ञानेश हटावो, लोकशाही बचावो'च्या घोषणाबाजीत इंडिया आघाडीची व्रजमुठ

## ज्ञानेश कुमार यांच्या विरोधातील इंडिया आघाडीच्या मोर्चाला प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)–** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासह एसआयआर रद्द करा व निवडणूका ईव्हीएम ऐवजी मतपत्रिकेद्वारे घ्या या मागण्यांसाठी नांदेडमध्ये आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) शिवसेना (ठाकरे गट), सीपीआय, आम आदमी पार्टीसह इंडिया आघाडीच्या पक्षांचा समावेश होता. बुधवारी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालयादरम्यान महामोर्चा काढून आंदोलन करण्यात आले.



छायाचित्र नरेंद्र गडप्पा

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी भाजप निवडणूक जिंकण्यासाठी वेळोवेळी काम केले आहे, हे आता सिद्ध झाले आहे. ज्ञानेश कुमार यांनी मनमानी कारभार करत गैरपद्धतीने एसआयआर मोहीम राबवली आहे. जोपर्यंत ज्ञानेश कुमार राजीनामा देत नाही, निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता येत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरू राहिल असे, मत यावेळी खा. रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केले.

ज्ञानेश कुमार हटावो, लोकशाही बचावो अशी प्रचंड घोषणाबाजी यावेळी करण्यात आली. या महामोर्चाला प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाला, यावेळी काँग्रेस दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खासदार रवींद्र चव्हाण, माजी मंत्री माधवराव पाटील किन्हाळकर, (पान ५ वर...)

# नांदेड जिल्ह्यातील शाळांना दिवाळी सुट्टी जाहीर

## ५ ते २३ नोव्हेंबरपर्यंत सुट्टी, २५ नोव्हेंबरपासून शाळा सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांसाठी दिवाळी सुट्टीचे अधिकृत नियोजन जाहीर करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून याबाबतचे परिपत्रक काढण्यात आले असून यंदा दिवाळी सुट्टी ५ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर २०२६ पर्यंत असणार आहे.

शिक्षण संचालक, पुणे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नांदेड यांच्या मान्यतेनंतर हे नियोजन जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये सर्व व्यवस्थापनाच्या आणि सर्व माध्यमांच्या शाळांचा समावेश आहे.

प्राप्त माहितीनुसार, गुरुवार दि. ५ नोव्हेंबर ते सोमवार दि. २३ नोव्हेंबर २०२६ पर्यंत एकूण १९ दिवस दिवाळी सुट्टी राहील. दि. २४ नोव्हेंबर २०२६ (पान ५ वर...)






# एमपीएससी आंदोलनाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला सुनावलं

## प्रक्रिया कशी राबवणार? तीन आठवड्यांत आराखडा सादर करा

**मुंबई (प्रतिनिधी)–** पुण्यामध्ये सुरू असलेल्या एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. त्यावर बुधवारी सुनावणी पार पडली. विद्यार्थी काही अँटी सोशल अर्थात समाजविघातक नाहीत. आंदोलन करणे हा विद्यार्थ्यांचा हक्क आहे. पुण्याला शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचा मुख्य उद्देश हा शिक्षण असतो ना की आंदोलन करण्याचा. तुम्ही विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करा. प्रत्येक विद्यार्थ्याला योग्य ती संधी मिळाली पाहिजे, असं म्हणत मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला कडक शब्दात निर्देश दिले. दुसरीकडे हायकोर्टाने विद्यार्थ्यांना आंदोलन मागं घ्या आणि आपल्या अभ्यासला लागा अशी विनंती केली.

**भीमनवारांच्या राजीनाम्याशिवाय माघार नाही –रोहित पवार**

आमचे आंदोलन सुरु होऊन सात दिवस झाले. आता महाज्योतीतही घोटाळा झाल्याचे समोर आले आहे. आंदोलन करणारे एमपीएससी विद्यार्थी गरीब आहेत म्हणून त्यांची चेष्टामस्करी करणार का? जोपर्यंत राज्य सरकार भीमनवारांना घरी पाठवत नाही तोपर्यंत विद्यार्थी ऐकणार नाहीत, असे रोहित पवार यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या चिंतेचा विचार करता, पुणे हे संपूर्ण देशातील शिक्षणाचे एक प्रमुख केंद्र आहे. जर विद्यार्थी अस्वस्थ किंवा आंदोलनाच्या भूमिकेत असतील, तर काही बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. त्यांना परीक्षा योग्य पद्धतीने होत नसल्याचे वाटत असेल, तर त्यावर योग्य कारवाई झाली पाहिजे. राज्य सरकारने आश्वासन दिले पाहिजे की कोणतीही परीक्षा निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने घेतली जाईल आणि कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होणार नाही. या रिक्त पदांची भरती कशी करणार? असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाने उपस्थित केला आहे, विशेषतः पुणे हे शिक्षणाचे केंद्र आहे आणि बहुतांश विद्यार्थी प्रामाणिकपणे शिक्षण घेण्यास इच्छुक आहेत. त्यांना या आंदोलनासारख्या गोष्टींमध्ये रस नाही. मात्र, सध्या संपूर्ण वातावरण दूषित झाले आहे. विश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न झाले पाहिजेत. या सर्व नेत्यांनी विद्यार्थ्यांना (पान ५ वर...)

# अल्-निनोच्या पार्श्वभूमीवर पाणी वापरात काटकसर करा –जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुरक्षित ठेवण्यासाठी सर्व घटकांना आवाहन



**नांदेड (प्रतिनिधी)–** अल्-निनोच्या संभाव्य प्रभावामुळे आगामी काळात पर्जन्यमानात घट होण्याची शक्यता आणि उपलब्ध जलसाठ्यावर निर्माण होणारा ताण लक्षात घेता ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुरक्षित ठेवण्यासाठी आतापासूनच प्रभावी नियोजन व उपाययोजना करणे आवश्यक आहे. उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने, प्राधान्यक्रमाने व नियोजनबद्ध पद्धतीने वापर करावा. पाणी बचत, पुनर्वापर आणि जलसंधारणाच्या उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, उद्योग, बांधकाम क्षेत्र तसेच व्यापारी व व्यावसायिक आस्थापनांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

शासनाच्या निर्देशानुसार १६ ऑक्टोबर २०२६ पासून पाणी वापरामध्ये किमान १० टक्के कपात करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक उपाययोजना कराव्यात. उपलब्ध जलसाठ्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्यास प्रथम व सर्वोच्च प्राधान्य द्यावे. आगामी कालावधीत संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी सर्व संबंधितांनी प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्राधान्य द्यावे.

सर्व शासकीय कार्यालये, विभाग व त्यांच्या अधिनस्त आस्थापनांनी पाण्याचा अनावश्यक वापर टाळावा. कार्यालयीन इमारती, शासकीय निवासस्थाने, उद्याने तसेच इतर ठिकाणी होणारी पाणीगळती तात्काळ शोधून (पान ५ वर...)

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# अक्षर ओळखीपलीकडची साक्षरता कोठे आहे?

'साक्षरता' म्हटले की, एखाद्या व्यक्तीला वाचता-लिहिता येते का, एवढाच प्रश्न आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो. पण एकविसाव्या शतकातील साक्षरतेची व्याख्या आता एवढ्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. नाव लिहिता येणे ही साक्षरतेची सुरुवात असू शकते; पण समजून वाचता येणे, योग्य निर्णय घेता येणे, आर्थिक व्यवहार सुरक्षितपणे करता येणे, डिजिटल जगात वावरता येणे आणि लोकशाही प्रक्रियेत आत्मविश्वासाने सहभागी होता येणे ही खरी साक्षरता आहे. जगात आजही सुमारे ७३९ दशलक्ष तरुण आणि प्रौढांना मूलभूत साक्षरतेची कौशल्ये अवगत नसल्याचे युनेस्कोच्या आकडेवारीतून स्पष्ट होते. त्याहून चिंताजनक बाब म्हणजे चारपैकी एकापेक्षा अधिक मुलांना कमान अपेक्षित वाचनक्षमता प्राप्त होत नाही. शाळेत प्रवेश मिळणे आणि खऱ्या अर्थाने शिक्षित होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत, हे या आकडेवारीने अधोरेखित केले आहे. भारताची स्थितीही याच विरोधाभासाची आहे. सहा ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांचे शाळेतील प्रवेशाचे प्रमाण ९८ टक्क्यांहून अधिक असणे ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. मात्र, शाळेत दाखल झालेली मुले अपेक्षित पातळीवर शिकत आहेत का, हा अधिक गंभीर प्रश्न आहे. ग्रामीण भागातील १४ ते १८ वर्षांच्या अनेक विद्यार्थ्यांना दुसरीच्या स्तरावरील मजकूरही सहज वाचता येत नाही. साधी इंग्रजी वाक्ये वाचण्यात आणि प्राथमिक गणिती उदाहरणे सोडवण्यातही मोठ्या प्रमाणावर अडचणी असल्याचे अहवाल सांगतात. म्हणजेच आपण 'शाळेत जाणारी मुले' वाढविली; पण 'शिकणारी मुले' पुरेशा प्रमाणात निर्माण करू शकलो का? हा प्रश्न आता शिक्षणव्यवस्थेने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने साक्षरतेची व्याप्ती वाचन-लेखनाच्या पलीकडे नेण्याचा योग्य प्रयत्न केला आहे. मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान, आकलनशक्ती, चिकित्सक विचार आणि जीवनकौशल्ये यावर भर देणे आवश्यकच आहे. कारण प्राथमिक शिक्षणाच्या टप्प्यावर मुलांच्या मनात ज्ञानाचा पाया भक्कम झाला नाही, तर पुढील शिक्षणाची इमारत कितीही आकर्षक असली तरी ती कमकुवतच राहणार. यासोबतच शाळा सोडणाऱ्या मुलांचा प्रश्नही तितकाच गंभीर आहे. प्राथमिक स्तरावर गळतीचे प्रमाण कमी झाले असले तरी माध्यमिक शिक्षणाच्या टप्प्यावर अनेक मुले शिक्षणव्यवस्थेबाहेर पडतात. गरिबी, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती, शाळेचे अंतर, घरातील जबाबदाऱ्या, बालविवाह आणि ग्रामीण भागातील मर्यादित शैक्षणिक सुविधा ही त्यामागील प्रमुख कारणे आहेत. प्रत्येक मुलाला शाळेत आणणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्याला माध्यमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेत टिकवणे महत्त्वाचे आहे. आज साक्षरतेसमोरील आणखी एक मोठे आव्हान म्हणजे डिजिटल साक्षरता. आधार, यूपीआय, ऑनलाइन बँकिंग, टेलिमेडिसिन, ऑनलाइन शिक्षण, सरकारी योजनांचे पोर्टल, दैनंदिन जीवनातील जवळपास प्रत्येक क्षेत्र डिजिटल होत आहे. स्मार्टफोन हातात असणे म्हणजे डिजिटल साक्षरता नव्हे. चुकीची माहिती ओळखता येणे, ऑनलाइन फसवणूक टाळणे, पासवर्ड आणि वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे, डिजिटल आर्थिक व्यवहार समजून घेणे आणि सरकारी सेवांचा योग्य वापर करता येणे ही आजच्या काळातील आवश्यक कौशल्ये आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिक, महिला, ज्येष्ठ व्यक्ती आणि पहिल्या पिढीतील शिकणाऱ्यांसाठी डिजिटल दरी मोठे आव्हान आहे. केवळ मोबाईल किंवा संगणक वाटून ही दरी संपणार नाही. तंत्रज्ञान वापरण्याचा आत्मविश्वास आणि त्यामागची समज निर्माण करावी लागेल. यासाठी शिक्षकांची भूमिका सर्वांत महत्त्वाची आहे. दर्जेदार शिक्षणाची सुरुवात दर्जेदार अध्यापनापासून होते. शिक्षकांना केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे लक्ष्य देण्यापेक्षा विद्यार्थ्यांना समजून शिकविण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण, साधने आणि स्वायत्तता देणे गरजेचे आहे. शिक्षणव्यवस्थेच्या केंद्रस्थानी विद्यार्थी असला पाहिजे आणि त्या विद्यार्थ्याच्या बौद्धिक विकासाच्या केंद्रस्थानी शिक्षक. साक्षरतेचा संबंध केवळ शिक्षणाशी नाही; तो स्वाभिमान, रोजगार, आर्थिक स्वावलंबन, सामाजिक न्याय आणि लोकशाहीशी आहे. साक्षर नागरिक सरकारी योजना समजून घेऊ शकतो, आपले अधिकार ओळखू शकतो, फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण करू शकतो आणि सार्वजनिक प्रश्नांवर विवेकाने मत व्यक्त करू शकतो. शाळेत प्रवेश घेतलेले प्रत्येक मूल शिकते आहे का? प्रत्येक विद्यार्थी दहावीपर्यंत पोहोचतो आहे का? प्रत्येक प्रौढाला आयुष्यभर शिकण्याची संधी आहे का? आणि प्रत्येक नागरिक डिजिटल जगात सुरक्षितपणे वावरू शकतो का? या प्रश्नांची उत्तरे सकारात्मक असतील, तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने साक्षर समाज निर्माण केला असे म्हणता येईल. अक्षरज्ञानाने डोळे उघडतात; पण समज, विवेक आणि कौशल्ये माणसाला जगण्याची दिशा देतात. म्हणून भारताची पुढची साक्षरता मोहीम 'अक्षरओळख' नव्हे, तर 'सक्षम नागरिक' घडविण्याची मोहीम असली पाहिजे.

# दुष्काळी परिस्थिती आणि आर्थिक कोंडीत सरकार ट्रॅप तर प्रत्येक हालचालीत जनता ट्रॅक



केंद्र आणि राज्य सरकार सुरक्षा, पारदर्शकता आणि कर आकारणी अधिक मजबूत करण्यासाठी वेगवेगळ्या स्तरांवर विविध महत्त्वाच्या गोष्टींवर हायटेक आणि रिअल-टाइम मॉनिटरिंग म्हणजेच थेट देखरेख ठेवण्यास सुरुवात करणार आहे. महाराष्ट्र सरकार दुष्काळ आणि आर्थिक संकटामुळे लाडकी बहीण योजनेसह एकूण २६ प्रमुख लोककल्याणकारी योजना आणि २५ शासकीय धोरणांवर महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक) द्वारे भारतीय व्यवस्थापन शिक्षण संस्था मुंबई (आयआयएम मुंबई) च्या सहकार्याने रिअल-टाईम मॉनिटरिंग म्हणजेच थेट देखरेख करणार आहे. याशिवाय, माहिती आणि जनसंपर्क संचालनालय (डीआयपीआर) अंतर्गत प्रसारमाध्यमं, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियावरील सर्व प्रकारच्या सकारात्मक व नकारात्मक बातम्यांचे अवलोकन करण्यासाठी राज्य सरकारने स्वतंत्र मीडिया मॉनिटरिंग सेंटरची स्थापना केली आहे. ज्याद्वारे सरकारविरोधी किंवा शासनाशी संबंधित बातम्यांवर सतत नजर ठेवली जाते. सांगायचे तात्पर्य म्हणजे सध्या सरकारचा मुख्य भर हा सरकारी योजनांचा खर्च, दुष्काळी उपाययोजना आणि सोशल मीडियावरील बातम्या ट्रॅक करण्यावर आहे.

२६ प्रमुख लोककल्याणकारी योजना आणि २५ शासकीय धोरणांवर प्रत्यक्ष नजर ठेवून १.२० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीच्या खर्चाचा मागोवा घेतला जाणार आहे. आयकर विभागाकडून बँक खात्यांमधील मोठ्या रोख (कॅश) व्यवहारांवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार असल्याने वर्षाला १० लाख रुपयांपेक्षा जास्त कॅश डिपॉझिट किंवा विथड्रॉवल झाल्यास सरकारकडून नोटीस येण्याची शक्यता आहे. ५ हजार रुपयांपेक्षा जास्त मूल्याचे सर्व डिजिटल व्यवहार आणि यूपीआय ट्रान्झॅक्शन्सच्या रेकॉर्डवर सरकार लक्ष ठेवल्याने डिजिटल पेमेंट ट्रॅक होणार आहे. सुरक्षितता आणि संशयास्पद खातीच्या दृष्टीकोनातून करचुकवेगिरी किंवा संशयास्पद उत्पन्न आढळल्यास अधिकृत अधिकाऱ्यांना बँक खाती, ईमेल आणि क्लाउड स्टोरेज तपासण्याची परवानगी देण्यात येणार आहे.

प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल मीडियामधील बातम्यांवर लक्ष ठेवण्यासाठी १० कोटी रुपये खर्चून 'मीडिया मॉनिटरिंग सेंटर' स्थापन केले आहे. ज्याद्वारे सरकारविरोधातील नकारात्मक बातम्या आणि चुकीच्या माहितीवर (फेक न्यूज) लक्ष ठेवले जाणार आहे. गृह मंत्रालयाने (एमएचए) सायबर गुन्हेगारी आणि बेकायदेशीर कंटेंट रोखण्यासाठी फेसबुक, इंस्टाग्राम आणि युट्यूब यांसारख्या प्लॅटफॉर्मवरील लाखो संशयास्पद लिंक्स आणि खात्यांवर मॉनिटरिंग वाढवून ते ब्लॉक करण्याचे आदेश दिले जाणार आहेत. पब्लिक ट्रान्सपोर्ट ट्रॅकिंग करण्याकरीता सार्वजनिक बसेस, टॅक्सी आणि इतर प्रवासी वाहनांमध्ये 'व्हीकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाईस' आणि पॅनिक बटन अनिवार्य करण्यावर सरकार विचार करत आहे. पॅनिक बटन दाबल्यास थेट राज्य सरकारच्या मॉनिटरिंग सेंटरला अलर्ट मिळतो. तसेच दिल्ली सरकारने प्रदूषणाचे स्रोत शोधण्यासाठी २४ तास चालणारे 'एआय-पावर्ड इंटीग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटर' सुरू करत आहे. ज्याद्वारे कचरा जाळणे, बांधकामाची धूळ आणि रिअल-टाइम एअर क्वालिटी वर थेट नजर ठेवली जाणार आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील २६ योजना आणि २५ धोरणांचा फेरआढावा घेतला जाणार आहे. १.२० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या योजनांच्या अंमलबजावणीवर रिअल-टाइम मॉनिटरिंग केले जाणार आहे. महाराष्ट्रातील महिलांसाठी महत्त्वाची योजना असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकडे सध्या विशेष लक्ष लागले आहे. राज्यात दुष्काळ आणि पाणी-चारा टंचाईची परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारसमोर एकीकडे शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी मदतीची गरज आहे, तर दुसरीकडे मोठ्या खर्चाच्या योजनांचे आर्थिक नियोजन करण्याचे आवाहन आहे. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या २६ योजना आणि २५ धोरणांचा फेरआढावा घेतला जाणार आहे. या योजनांवर १.२० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाचा आवाका असल्याचे सांगितले जात आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र महिलांना आर्थिक मदत दिली जाते. त्यामुळे या योजनेसाठी राज्याच्या अर्थसंकल्पातून मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करावी लागते. आता दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी अतिरिक्त मदतीची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेसह मोठ्या खर्चाच्या योजनांचे आर्थिक नियोजन पुन्हा चर्चेत आले आहे. दुष्काळामुळे सरकारसमोर दुहेरी आवाहन असल्याने आणि २६ योजना नि २५ धोरणांचा फेरआढावा घेतला जाणार असल्याने लाडकी बहीण योजना बंद होणार का? लाडकी बहीण योजनेचा फेरआढावा घेतला जाणार का? दुष्काळामुळे लाडकी बहीण योजनेवर परिणाम होणार का? २६ योजनांचा फेरआढावा का घेतला जात आहे? यासारखी अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. योजनांची अंमलबजावणी, खर्च आणि प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोच यांचे अधिक प्रभावी मॉनिटरिंग करण्यासाठी सरकारकडून राबवण्यात येणा-या २६ योजना आणि २५ धोरणांच्या अंमलबजावणीचा फेरआढावा घेतला जाणार आहे. या योजनांचा निधी योग्य पद्धतीने वापरला जात आहे का? योजना अपेक्षित परिणाम देत आहेत का? आणि त्याचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतो का? यावर लक्ष दिले जाणार आहे. यासाठी महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष अर्थात 'महा-टॅक' च्या माध्यमातून रिअल-टाइम मॉनिटरिंग व्यवस्था वापरण्यात येत आहे.

सध्या लाडकी बहीण योजना बंद करण्याचा अधिकृत निर्णय झाल्याचे यातून दिसत नाही. २६ योजना आणि २५ धोरणांचा फेरआढावा घेण्याचा अर्थ संबंधित योजना तातडीने बंद केल्या जातील किंवा त्यांचे पैसे थांबवले जातील, असा थेट निष्कर्ष काढता येत नाही. दुष्काळामुळे राज्याच्या आर्थिक नियोजनावर अतिरिक्त दबाव येऊ शकतो. मात्र योजनेच्या लाभांवर बदल होणार की नाही हे निश्चित सांगता येत नाही. फेरआढाव्यात योजनांचा खर्च, अंमलबजावणी आणि लाभार्थ्यांपर्यंत पोहोच यांचा आढावा घेतला जाणार आहे. मराठवाडा आणि विदर्भातील पाणी व चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांसाठी मदतीची मागणी वाढत आहे. अशा परिस्थितीत सरकारला दुष्काळग्रस्त भागासाठी उपाययोजना करण्यासोबतच विविध कल्याणकारी योजनांसाठी निधीचे नियोजन करावे लागणार आहे. त्यामुळे पुढील काळात लाडकी बहीण योजनेसह मोठ्या आर्थिक आवाक्याच्या योजनांबाबत सरकार कोणते निर्णय घेते, याकडे महिलांसह सर्वांचे लक्ष राहणार आहे.

महाराष्ट्रात ऐन दुष्काळी परिस्थितीमुळे आणि ढासळत्या आर्थिक समीकरणांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकार क्शन मोडवर आले आहे. महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक) स्थापन करण्याची गरज सरकारला का भासली? राज्याची आर्थिक स्थिती नेमकी कशी आहे? अर्थसंकल्प सादर करताना ४०,५५२ कोटींची महसुली तूट आणि १.५ लाख कोटींची राजकोषीय तूट अपेक्षित धरण्यात आली होती. त्यातच नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्याच तिमाहीत राज्य सरकारने तब्बल ९७ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. आधीच 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना', शेतकऱ्यांना मोफत वीज आणि आता कर्जमाफी... यामुळे राज्यावरील कर्जाचा बोजा तब्बल ११ लाख कोटींवर गेला. केवळ कर्जाचं व्याज फेडण्यासाठी यावर्षी ७० हजार कोटींचा विक्रमी खर्च होणार आहे. अशा बिकट आर्थिक परिस्थितीत दुष्काळी उपाययोजना करण्यासाठी सरकारला आणखी कर्ज काढण्याशिवाय पर्याय नाही. याच पार्श्वभूमीवर १.२० लाख कोटीपेक्षा जास्त खर्चाच्या योजनांचं थेट मूल्यमापन करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. मात्र, महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक) द्वारे कोणत्या योजनेचं आणि धोरणांचे मूल्यमापन होणार? आणि कसे होणार?

उद्योग, आयटी, इलेक्ट्रिक वाहन, ग्रीन हायड्रोजन, पर्यटन, गृहनिर्माण आणि महिला धोरण यासह २५ प्रमुख धोरणांचे, १.२० लाख कोटींच्या २६ प्रमुख योजनांचे दर तिमाही समांतर मूल्यमापन होणार...योजनांचा लाभ वेळेत आणि योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचतो का? खर्चाची गुणवत्ता आणि निरुपयोगी मालमत्ता यांचा आढावा, विविध विभागांमधील भ्रष्टाचाराचे छुपे मार्ग शोधून ते बंद करण्यासाठी ठोस निर्णय, मुख्यमंत्री कार्यालयाला थेट लाईव्ह डॅशबोर्ड आणि तिमाही अहवाल सादर करणं बंधनकारक असणार आहे. एकीकडे दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी अडचणीत आहेत, तर दुसरीकडे तिजोरीवर ११ लाख कोटींचा डोंगराएवढा कर्जाचा भार राज्यावर आहे. मात्र मुख्यमंत्र्यांचे थेट या खर्चिक योजनांवर लक्ष असल्याने प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. अशा स्थितीत १.२० लाख कोटींच्या योजनांचा 'महा-टॅक' द्वारे घेतला जाणारा हा फेरआढावा सरकारी पैशांची उधळपट्टी थांबवेल की लाडकी बहीण सारख्या लोकप्रिय योजनांना कात्री लावेल याची उत्सुकता आहे.

-सुनील शिरपुरे
कमळवेल्ली, यवतमाळ
मो. ७४९८८८५०६१

# समाधानी मन हीच खरी श्रीमंती

आयुष्यात देवाकडे सगळं मागण्यापेक्षा, जे मिळते त्यात समाधानी राहण्याची बुद्धी मागा; या जगातलं समाधान हेच सर्वात मोठं सुख आहे.

माणूस जन्माला येतो तेव्हा त्याच्या हातात काहीच नसते. आणि या जगाचा निरोप घेतानाही तो काही घेऊन जात नाही. तरीही या दोन टोकांच्या मधल्या प्रवासात तो आयुष्यभर काही ना काही मिळविण्यासाठी धावत राहतो. पैसा, घर, जमीन, वाहन, पद, प्रतिष्ठा, प्रसिद्धी, यश... इच्छा संपत नाहीत आणि अपेक्षांनाही अंत नसतो. एक मिळाले की दुसरे हवे असते आणि दुसरे मिळाले की तिसऱ्याची आस लागते. या सततच्या 'हवे आहे'च्या प्रवासात माणूस अनेकदा 'माझ्याकडे काय आहे ?' हेच विसरून जातो. खरे तर आयुष्य सुंदर होण्यासाठी प्रत्येक गोष्ट मिळणे आवश्यक नसते; मिळालेल्या गोष्टींचे सौंदर्य अनुभवता येणे आवश्यक असते.



आज आपण प्रगतीच्या काळात जगत आहोत. विज्ञानाने जग जवळ आणले आहे. तंत्रज्ञानामुळे सुखसोयी वाढल्या आहेत. हातातील मोबाईलवर जगभरातील माहिती मिळते. पूर्वी तासन्तास लागणारी कामे काही क्षणांत होतात. पण एक प्रश्न मात्र कायम आहे, सुखसोयी वाढल्या, मग मनाचे समाधान का वाढले नाही? कारण सुख आणि समाधान या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. सुख एखाद्या वस्तूमुळे मिळू शकते; समाधान मात्र मनाच्या अवस्थेतून जन्माला येते. नवीन मोबाईल घेतल्यावर काही दिवस आनंद होतो; नवीन वाहन घेतल्यावर उत्साह येतो; नवीन घर मिळाल्यावर अभिमान वाटतो. पण काही काळाने त्या गोष्टी रोजच्या जीवनाचा भाग बनतात. पुन्हा एखादी नवीन वस्तू हवीशी वाटते. यालाच इच्छांचा अंतहीन प्रवास म्हणता येईल. म्हणूनच समाधानाचा अर्थ गरिबी स्वीकारणे किंवा महत्त्वाकांक्षा सोडणे असा अजिबात नाही. समाधान म्हणजे प्रयत्न सोडणे नव्हे; तर प्रयत्न करताना मनाची शांतता न गमावणे होय. मोठे स्वप्न पाहावे. ध्येय निश्चित करावे. मेहनत करावी. स्वतःला कालपेक्षा आज अधिक चांगले बनवण्याचा प्रयत्न करावा. पण या प्रवासात स्वतःच्या आयुष्याचा आनंद पुढे ढकलत राहू नये. हे मिळाले की मी सुखी होईन, ते झाले की आनंदी होईन, असे म्हणत राहिलो तर तो दिवस कधीच येत नाही. कारण एक इच्छा पूर्ण होताच दुसरी इच्छा आपल्या दारात उभी असते.

आजच्या काळात असमाधानाचे आणखी एक मोठे कारण म्हणजे तुलना. सोशल मीडियामुळे दुसऱ्यांच्या आयुष्याची चमक सतत आपल्या डोळ्यांसमोर असते. कोणीतरी नवीन घर घेतलेले दिसते, कोणीतरी परदेशात फिरताना दिसतो, कोणीतरी महागडी गाडी घेतलेली दिसते, कोणाचे मूल मोठ्या पदावर पोहोचलेले दिसते. ते पाहून नकळत आपल्या मनात प्रश्न निर्माण होतो की आपल्याकडे असे का नाही? पण आपण एक गोष्ट विसरतो, आपण दुसऱ्याच्या आयुष्यातील फक्त दिसणारा भाग पाहत असतो; त्याचा संपूर्ण संघर्ष नाही. प्रत्येक माणसाच्या आयुष्यात सुख-दुःखाचे स्वतःचे गणित असते. म्हणून दुसऱ्याच्या आयुष्याशी तुलना करून स्वतःच्या आनंदाची किंमत ठरवू नये. आपला प्रवास आपला असतो. प्रत्येकाला मिळणाऱ्या संधी, परिस्थिती आणि जबाबदाऱ्या वेगळ्या असतात. कधी कधी आपण ज्याला सामान्य समजतो, त्याच गोष्टीसाठी दुसरा माणूस आयुष्यभर वाट पाहत असतो.

आपल्याकडे आई-वडील आहेत, पण आपण त्यांच्या उपस्थितीची किंमत जाणत नाही. एखाद्याने आई-वडिलांना गमावलेले असते. आपल्याकडे कुटुंब आहे, पण आपण त्यांच्यासोबत दोन क्षण शांतपणे बसत नाही. एखादा माणूस एकटेपणाशी झुंजत असतो. आपल्याकडे निरोगी शरीर आहे, पण आपण त्याकडे लक्ष देत नाही. एखादा आजाराने त्रस्त असतो आणि फक्त निरोगीपणासाठी प्रार्थना करत असतो. म्हणूनच कृतज्ञता ही समाधानाची पहिली पायरी आहे.

दररोज काही क्षण स्वतःला विचारले पाहिजे, आज माझ्याकडे असे काय आहे ज्याबद्दल मी मनापासून आभारी आहे ? हा प्रश्न मनाला बदलू शकतो. कारण आपले लक्ष अभावापासून उपलब्धतेकडे वळते. समाधानी माणूस परिस्थितीचा गुलाम नसतो. परिस्थिती प्रतिकूल असली तरी त्यात मार्ग शोधण्याची ताकद त्याच्यात असते. अपयश आले तर तो स्वतःला संपलेले समजत नाही. यश मिळाले तर तो अहंकारात वाहून जात नाही. कारण त्याला आपल्या आनंदाची चावी बाहेरच्या जगाच्या हातात द्यायची नसते.

आज पालकांनीही मुलांना हा संस्कार देण्याची गरज आहे. प्रत्येक मागणी लगेच पूर्ण करण्याऐवजी कधीकधी त्यांना प्रतीक्षा शिकवली पाहिजे. प्रत्येक वस्तू मिळवून देण्याऐवजी वस्तूंची किंमत समजावून सांगितली पाहिजे. इतर मुलांकडे आहे म्हणून आपल्यालाही हवे, या मानसिकतेऐवजी आपल्याकडे जे आहे त्याचा योग्य उपयोग करूया हा विचार रुजवला पाहिजे. कारण वस्तू वाढल्या म्हणून जीवन समृद्ध होत नाही; वस्तूंचा आनंद घेणारे मन समृद्ध झाले की जीवन खऱ्या अर्थाने समृद्ध होते. देवाकडे प्रार्थना करताना आपण नेहमी मागत असतो, पैसा दे, यश दे, सुख दे, अडचणी दूर कर. पण कधी आपण अशी प्रार्थना केली आहे का? देवा, माझ्या इच्छा अनंत आहेत; पण माझ्या गरजा ओळखण्याची बुद्धी दे. मला जे मिळाले आहे त्याची किंमत समजण्याची दृष्टी दे. संकट आले तर धैर्य दे आणि सुख आले तर नम्रता दे. दुसऱ्याच्या यशाचा हेवा न करता त्यातून प्रेरणा घेण्याचे मन दे. आणि माझ्या वाट्याला आलेल्या आयुष्यात समाधानाने जगण्याची शक्ती दे. कदाचित अशी प्रार्थना आपल्या आयुष्याची दिशा बदलू शकते.

कारण पैसा माणसाला सुविधा देऊ शकतो; पण समाधान विकत घेता येत नाही. मोठे घर मिळू शकते; पण त्या घरात शांतता निर्माण करण्यासाठी प्रेम लागते. प्रसिद्धी मिळू शकते; पण मनःशांतीसाठी समाधान लागते.

शेवटी माणसाच्या आयुष्याचा खरा हिशेब किती मिळवले याने होत नाही; किती आनंदाने जगलो, किती माणसे जोडली, किती क्षण मनापासून अनुभवले आणि मिळालेल्या जीवनाबद्दल किती कृतज्ञ राहिलो, याने होतो.

म्हणून आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर एक गोष्ट मनाशी पक्की करूया, ध्येय मोठे ठेवूया, पण अपेक्षांचे ओझे मोठे करू नको. प्रयत्न प्रामाणिक करूया, पण परिणामाची चिंता मनावर राज्य करू देऊ नको. जे मिळवायचे आहे त्यासाठी मेहनत करूया; पण जे आधीच मिळाले आहे त्याचा आनंद घ्यायलाही शिकूया. कारण आयुष्याला सुंदर बनवण्यासाठी नेहमी अधिक गोष्टींची गरज नसते; कधी कधी त्याच गोष्टींकडे नव्या नजरेने पाहण्याची गरज असते. आणि म्हणूनच देवाकडे पुढच्या वेळी काही मागताना एक मागणे नक्की मागूया देवा, मला सगळे काही देण्यापेक्षा, जे दिले आहे त्यात आनंदी राहण्याची बुद्धी दे. कारण समाधानी मन हीच खरी श्रीमंती आहे, कृतज्ञ हृदय हीच खरी संपत्ती आहे आणि शांत मन हेच या जगातील सर्वात मोठे सुख आहे.

-नासा येवतीकर
धर्माबाद

# दुसऱ्याकडून मदतीची अपेक्षा ठेवताना...

जीवन म्हटले की, त्याचा एक प्रवास असतो. प्रवासात सुरुवात अन् शेवट दोन्हीही असतात. त्यात गाडी रस्त्यात कधीमधी बिघडते. कधी आर्थिक गाडी बिघडते, तर कधी शारीरिक, तर कधी भावनिक! पण जेव्हा-जेव्हा जीवनाची गाडी रुळावरून घसरते, तेव्हा-तेव्हा ती सावरायला दुसरी गाडी मदतीला धावून येत असते. हाच आयुष्याचा चढता-उतरता आलेख असतो. हा आलेख प्रत्येकाच्या जीवनात येत असतो. प्रत्येकाला एक आयुष्य ठरवून दिलेले आहे. ५०-६०-७० जितके काही वर्षांचे असेल तितके! त्यात प्रत्येकाच्या वाट्याला काही कामे दिलेली आहेत. ती कामे कधी जीवन व्यवस्थित व्यतीत करता यावीत म्हणून उदरनिर्वाहाची साधने असतील, तर कधी काही 'हार्ड टास्क'ही प्रत्येकाच्या वाट्याला येत असतात. त्याचे स्वरूप प्रत्येकानुरूप वेगळे असेलही, पण त्या टास्क, तो कठीण काळ कोणालाही चुकलेला नाही. फार-फार झाले तर २-४% लोकं पूर्णपणे सुखी असतील, असले तर? आपण म्हणतो न, सोन्याचा चमचा घेऊन जन्मलेले, तसे! हा कठीण काळ, गरीब असो की श्रीमंत प्रत्येकाच्या हिश्याला आहेच. त्याचे वेगवेगळे स्वरूप असू शकेल. पण, हा कठीण काळ, आयुष्यात एकदा तरी येतोच! तो कधीच चुकत नाही.

जसे वेळप्रसंगी एकमेकांना आपण सहकार्य करतो, तसे या कठीण काळातही आपली हातची कामे सोडून इतरांना मदत करत असतो. म्हणजे मदत करायचीच असते. प्रत्येकवेळी मी अडचणीत आहे; हे म्हणणे बरे नव्हे! थोडक्यात सौम्य का होईना, आपणसुद्धा त्यावेळेस सुखासुखी आयुष्य सोडून कठीण काळात जात असतो. हेतू एवढाच की, तो देखील आपल्या कठीण काळात कामी येईल. जसे आपण पुढच्या भविष्यासाठी थोडेसे पैसे जमा करून सुरक्षित ठेवतो. तशी ही माणसे आपण आपल्यासाठी 'सुरक्षित' करत असतो.



आता हा झाला लोकांचा सामान्य प्रकार. जो समाजात बहुसंख्याक असतो. पण यालाही काही अपवाद आहेत. हे अपवाद म्हणजे थोडेसे वेगळे. समाजात काय चालू आहे, याची जाण नसलेले; स्वतःच्या धुंदीत असणारे असतात. ही माणसे इतरांच्या कामी कधीच येत नाहीत. पण, आपल्या कामी सर्वांनी यावे; अशी यांची इच्छा असते. समजा आपल्या कामी कोणी आलेच नाही; तर समाज, नाते, मित्र बिघडले असे घोषित करून मोकळे होतात. त्यावेळेस आपणही या समाजाचाच भाग आहोत; हे ध्यानी ठेवायला पाहिजे होते. त्याचा सारासार विसर या लोकांना पडलेला दिसतो. मी कधी कोणाच्या कामाला स्वतःचे काम सोडून गेलो? याचा विचार केला पाहिजे. निदान, 'काही लागले तर मी येऊ का? काही मदत करू का?' असे तरी विचारलेले असावे. लोकं एकदा चहा पाजला, की दुसऱ्यांदा समोरच्याकडून अपेक्षा ठेवतात. आपसातल्या मदतीला कसे विसरतील बरे!

मी असे अजिबात म्हणत नाही, की समाज अगदी स्वार्थी झाला आहे. कोणी कोणाची मदत करायला तयारच नाही. तसे पहायला गेले तर, कोणी कोणाकडून विनाकारण मदतीची अपेक्षाही ठेवू नये. जसे तुम्हाला खंडीभर कामे आहेत, तसे इतरांनाही असतात. त्यामुळे ते सुद्धा इच्छा असून येऊ शकत नाहीत. 'हा आला, तो आला, तू नाही आला.' असे नाही म्हणू शकत आपण. तो आला, कारण त्याला वेळ होता; तो आला- कारण त्यालाही तुम्ही कधी मदत केली होती; म्हणून आला. आता मदत पण जशाला तशी परतफेड करायची असते. जसे पैशाची पैशाने, शारीरिक कष्टाची शारीरिक कष्टानेच, भावनिक आधाराची भावनिक आधाराने. त्याने शारीरिक मेहनत करून सहकार्य केले तर तुम्ही त्याला पैसे देऊन परतफेड करू शकत नाही. समोरच्याकडे जर तेव्हा पैसे नसतील तर कदाचित ती मदत होईलही, पण तेव्हा जर त्याला तुमच्याकडून शारीरिक मेहनतीची गरज असेल तर तुम्हाला तशीच मदत करून परतफेड करावी लागेल.

आजकाल एक ट्रेंड झाला आहे, मदत करण्याचा! पण कोणाला? ज्याला गरज नाही त्याला. मग ही मदत एखाद्या गरिबाला केली तर सेल्फी काढली जाईल. आमिराला मदत केली तर लाळ पुसून नन्तर घोटण्याची प्रक्रिया सुरू होईल. मुळात त्याच्यामागे शेकडो हात असताना तुम्ही तिथे जायची गरजच नव्हती. तुम्ही तिथे नसते तरी काही फरक पडला नसता, पण आपली पुढे-पुढे करायची सवय जातच नाही. दुसरीकडे बऱ्याच जणांना लाख मदतीचे हात असतात, तरी त्यांना आणखी तिसऱ्याची अपेक्षा असते. मग ह्या तिसऱ्याच्या संकटाच्या काळात हा धावून जात नाही. तेव्हा त्या बिचाऱ्यासोबत कोणी नसते. तुम्ही जर अगोदर पुढाकार घेतला असता तर काही फरक पडला नसता राव! सद्सद्विवेकबुद्धी वापरून माझं-तुझं न करता, गेले असते तर इगो लगेच मरत नव्हता तुमचा. कोणाला किती गरज आहे? हे आधी ओळखायचे, व मग अपेक्षांचा फॉर्म्युला ठरवायचा. अपेक्षा खूप लांबवर असतात. तिथपर्यंत पोहचायला आधी सहकार्याची स्टेप पार करावी लागते. आजकाल तर फोन कॉल्सचा जमाना झाला. गरज नसताना अवघड सल्ले व आधार द्यायला भरपूर जमा होत आहेत. विचारपूस करत आहेत. जो अनाथ आहे, त्याला अशी विचारपूस गोड वाटेलही, पण ज्याला पूर्ण नाती, ती पण जीवंत आहेत त्याचा काहीही फायदा होणार नाही. कदाचित तेव्हा त्याला पैशाची, तुम्ही तिथे कठीण काळात सोबत असण्याची आवश्यकता होती. तसे काही तुम्ही करू शकलात तर मदत. नाहीतर तुमचे एकपात्री अपयशी नाटकच! बऱ्याचवेळा नवरा-बायकोत, पण इगो फाइट होत असते; एकमेकांची शुश्रूषा करण्याविषयी. पण हे दोन्हीकडून होणे अपेक्षित आहे. कोणताही एक तशी अपेक्षा, स्वतः काहीही न करता ठेवू शकत नाही. आणि नवरा-बायको एकमेकांना सहकार्य करू शकत नसतील तर ते नावालाच?

आई-वडील मुलाला लहानाचे मोठे करतात, म्हणजे मुलाचेही म्हातारपणी त्यांना आधार देण्याचे कर्तव्ये आहे. तो तसा करत नसेल तर कृतघ्नच म्हणावा लागेल. त्यामुळे आपण कोणाकडूनही अपेक्षा ठेवताना, आपण त्या व्यक्तीच्या किती कामी आलो होतो? याचा विचार करावा. हं! तुमच्याकामी कोणी आले नसेल, तर तुम्हीही त्यांच्या कामी येऊ नका. कारण ते नसताना तुमची वेळ निभावली होती, तर पुढे ते असणे- नसण्याने काहीही फरक पडणार नाही.

-अमोल भारती
नांदेड
मो. ८८०६७२१२०६

# निकृष्ट चाऱ्याला युरिया प्रक्रियेतून मिळणार सकसतेची जोड

- चारा साक्षरता अभियानांतर्गत देगलूर येथे पशुपालकांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक
- चारा टंचाईवर शास्त्रीय व्यवस्थापनाचा संदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** सेवा संकल्प अभियानांतर्गत रविवार, दि. ६ ऑक्टोबर रोजी देगलूर उपविभागीय कार्यालयात चारा साक्षरता अभियान राबविण्यात आले. दुष्काळसदृश परिस्थिती आणि संभाव्य चारा टंचाई लक्षात घेता उपलब्ध चाऱ्याचा शास्त्रीय व कार्यक्षम वापर करून पशुधनाला सकस व पौष्टिक चारा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.



जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्या संकल्पनेतून तसेच जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन, नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात निकृष्ट चाऱ्याची पौष्टिकता वाढविण्यासाठी सोयाबीन गुळीवर युरिया प्रक्रिया करून सकस चारा तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक उपस्थित शेतकरी व पशुपालकांना करून दाखविण्यात आले.

यावेळी युरिया प्रक्रियेद्वारे निकृष्ट चाऱ्याची पौष्टिकता, पाचकता आणि रुचकरता वाढविण्याची शास्त्रीय पद्धत सविस्तर समजावून सांगण्यात आली. तसेच उपलब्ध चाऱ्याचे योग्य संवर्धन, साठवणूक आणि शास्त्रीय व्यवस्थापन करून चारा टंचाईच्या काळात त्याचा पशुधनासाठी प्रभावी वापर कसा करता येईल, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रसंगी उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, तहसीलदार सूर्यवंशी, नायब तहसीलदार सरकलवाड तसेच विविध विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

हे प्रात्यक्षिक देगलूरचे सहायक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. आर. व्ही. सुरेवाड व तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एस. एल. पाशमवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. एस. आर. यंकम यांनी उपस्थित नागरिक, शेतकरी व पशुपालकांना प्रत्यक्ष करून दाखविले.

चारा टंचाईवर प्रभावी समाधान हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. उपलब्ध चाऱ्याचा योग्य वापर, त्याचे शास्त्रीय संवर्धन व व्यवस्थापन केल्यास चारा टंचाईच्या काळात पशुधनासाठी पुरेसा व सकस चारा उपलब्ध करून देण्यास मदत होणार आहे.

## सिडकोतील बालाजी मंदिरात ब्रह्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको येथील श्री भगवान बालाजी मंदिराच्या ३६ व्या दसरा ब्रह्मोत्सवा निमित्त ११ ऑक्टोबर ते २० ऑक्टोंबर दरम्यान दैनंदिन होमहवनविधी, अभिषेक, कलशाभिषेक, वसंत व कल्याण उत्सव आदी कार्यक्रमासह रथयात्रा मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात येत असून, रंगरंगोटीसह मंदिरावर व कमान प्रवेशद्वार येथे रोषणाई करण्यात येत आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भगवान बालाजींचा ब्रह्मोत्सव मोठ्या प्रमाणात आयोजित करण्यात आला असून, ११ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर दरम्यान आचार्य पंडित श्रीमान पवनकुमार यज्ञाचार्य व मंदिर पुजारी दिव्यांशु महाराज यांच्या आचार्य तत्त्वाने सकाळी अभिषेक, नामपाठ, होमहवन विधीपूर्वक संपन्न होणार आहे. दररोज वाहनातून भगवान बालाजी उत्सव मूर्तीची मिरवणूक सकाळी व सायंकाळी निघणार आहे. १८ ऑक्टोबर रोजी बालाजी लक्ष्मी पद्मावती विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सोमवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता मुख्य मार्गावरून रथयात्रा निघणार आहे. या ब्रम्होत्सवामध्ये दैनंदिन सुप्रभात, अभिषेक, बालभोग, प्रबंध पाठ व सायंकाळी नियोजित धार्मिक विधी रोजी ध्वजाहारोहण व बली प्रदान, प्रबंध पाठ होणार असून, सूर्यप्रभा वाहन, प्रबंध पाठ, हवण, वसंत उत्सव होणार आहे. सरस्वती भजन मंडळ महिला १ ते ४ लक्ष्मी पद्मावती सहित व्यंकटेश भगवान १०८ उत्सव अभिषेक, सुप्रभात हवण आरती २० ऑक्टोबर रोजी विजयादशमी दसरा निमित्ताने सुप्रभात अभिषेक, बालभोग, आरती, सर्व दर्शन हवण आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. विजयादशमी दसरानिमित्त २० ऑक्टोंबर रोजी अभिषेकानंतर भक्तांना भगवान बालाजीचे दर्शन देण्यात येणार आहे. या ब्रम्होत्सव सोहळ्यात जास्तीत जास्त भाविक भक्तांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नांदेड जिल्हा परिषदेत सेवानिवृत्त उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे अर्धनग्न 'भीक मांगो' आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)–** सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची थकीत रक्कम मिळावी या मागणीसाठी सेवानिवृत्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी उत्तम कोमवाड यांनी जिल्हा परिषदेच्या आवारात अर्धनग्न अवस्थेत 'भीक मांगो' आंदोलन केले.

पंचायत विभागाचे तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम केलेले उत्तम कोमवाड यांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडून मानसिक छळ होत असल्याचा आरोप केला आहे.

कोमवाड यांच्या म्हणण्यानुसार त्यांची सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम प्रशासनाने थकविली आहे. ही रक्कम अदा करण्याची मागणी केली असता, प्रशासन माळेगाव यात्रेच्या आगाऊ रक्कमेचा हिशेब न लावल्याचे कारण पुढे करत आहे. दोन्ही विषय वेगळे असूनही प्रशासन मुद्दाम गळचेपी करत असल्याचा त्यांचा आरोप आहे.

या संदर्भात त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील आणि सामान्य प्रशासनाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार यांची भेट घेऊन रक्कम अदा करण्याची मागणी केली होती. मात्र, दखल न घेतल्याने त्यांनी दि. ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत जिल्हा परिषदेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर हातात पातेले आणि




गळ्यात 'मला न्याय पाहिजे, भीक मांगो आंदोलन'चा फलक लावून आंदोलन केले.

सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकाऱ्याने अशा प्रकारे आंदोलन केल्याने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मान खाली घालावी लागली असून, आवारात याची जोरदार चर्चा सुरू आहे. थकीत रक्कम तत्काळ अदा न केल्यास यापेक्षा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा कोमवाड यांनी दिला आहे.

## माजी पं. स. सभापती व्यंकटराव मुकदम यांना अभिवादन



**लोहा (प्रतिनिधी)–** कंधार व लोहा या दोन्ही तालुक्याचे माजी सभापती ज्येष्ठ नेते व्यंकटराव मुकदम -चव्हाण यांच्या २४ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त त्यांना लोह्यात विविध संस्थेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

स्व. व्यंकटराव मुकदम हे १९७८ ते १९९० या काळात कंधार व २००३ ते २००४ या काळात लोहा पंचायत समितीचे सभापती होते. सभापती पदावर असतानाच त्यांचे निधन झाले.लोहा कृउबा समितीचे दीर्घ काळ सभापती, कलंबर सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन, भूविकास बँकेचे संचालक, लोहाचे सरपंच अशा विविध पदांवर त्यांनी सार्वजनिक जीवनात काम केले. ग्रामीण भागात मूलभूत सुविधा, आरोग्य, शाळा, पाणी या विषयांवर त्यांनी केलेले काम ग्रामविकासासाठी उपयुक्त ठरले असल्याचे उपस्थितांनी आपल्या भाषणात सांगितले.

स्व. व्यंकटराव मुकदम यांच्या २४ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त सेवानिवृत्त कृषी अधिकारी माणिकराव मुकदम, नारायण चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, माधवराव चव्हाण, दंत शल्यचिकित्सक डॉ. दिनेश चव्हाण, सचिन मुकदम, प्राचार्य डी. एम. पवार, बिपीन पवार, नारायण पवार यांनर पुण्यस्मरण निमित्ताने पूजाअर्चा करून अभिवादन केले.

माजी आ. रोहिदास चव्हाण, प्रवीण पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पवार, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, उपनगराध्यक्ष करीम शेख, माजी नगरसेवक वसंतराव पवार ,माजी उपनगराध्यक्ष छत्रपती धुतमल, दता वाले हरिभाऊ चव्हाण भास्कर पवार अशोक संगेवार , डेप्युटी इंजि.अशोक पाटील, विश्वांभर मंगनाळे, बाबुराव केंद्रे, मुख्याध्यापक दामोदर वडजे, हणमंत पवार, हरिहर धुतमल, गोविंद कदम यासह मोठ्या संख्येने मित्रपरिवार उपस्थित होते.

## सिडको परिसरात दुर्गा महोत्सवाची जय्यत तयारी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत शहरी व ग्रामीण दुर्गा महोत्सव सार्वजनिक मंडळांनी जय्यत तयारी केली आहे. सिडको परिसरात असलेल्या भगवान बालाजी मंदिर येथे ३६ वा तर हडको भागातील बालाजी मंदिर येथे २४, तर कौठा येथील बालाजी मंदिर येथे १६ व्या ब्रम्होत्सव निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन ११ ते २० ऑक्टोबर दरम्यन करण्यात आले आहे.दुर्गा महोत्सव निमित्ताने ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त लावण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

दुर्गा महोत्सवानिमित्ताने ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत शहरी व ग्रामीण दुर्गा महोत्सव सार्वजनिक मंडळांनी ऑनलाईन नोंदणीसाठी कागदपत्रांची जमावाजमवी केली आहे. अनेक मंडळांनी नांदेड शहरासह लातूर, लोहा, विदर्भातील उमरखेड व परराज्यातील आंध्र प्रदेश, तेलंगणा येथून दुर्गा माता मूर्ती खरेदी केल्या आहेत.

सिडकोतील गुरूवार बाजार परिसरात माता वैष्णवी दुर्गा महोत्सव मंडळांनी जयत तयारी केली आहे. मंडप, लाईटींग, देखावा यासह अनेक कामे मंडळ पदाधिकारी करीत आहेत तर दसरा ब्रम्होतसव निमित्ताने सिडको-हडकोसह बालाजी मंदिर कौठा येथे बालाजी मंदिरात ११ते २० ऑक्टोबर दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## अंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग व तायक्कांदो स्पर्धेत वसंतराव नाईक महाविद्यालयाची 'सुवर्ण' कामगिरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या सेंटर झोन बॉक्सिंग व तायक्कांदो स्पर्धेत वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'सुवर्ण' कामगिरी बजावली आहे. सेंटर झोन बॉक्सिंग स्पर्धेत ओमकार मारतळे, जय उचडे आणि देवा पुयड या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वजन गटातून सुवर्ण पदक पटकावले.

तायक्कांदो क्रीडा प्रकारातही जय उचले हा विद्यार्थी ६० ते ६५ किलो वजन गटात सुवर्णपदकाचा मानकरी ठरला. हाडोळती येथील कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालयात विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने




या स्पर्धा पार पडल्या. महाविद्यालयाच्या या यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांची नांदेड विद्यापीठ अंतर्गत होणाऱ्या अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेच्या कॅम्पसाठी निवड झाली आहे. प्राचार्य प्रो. डॉ. शेखर घुंगरवार यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. उपप्राचार्य डॉ. विष्णू राठोड, कार्यालयीन सेवानिवृत्त अधीक्षक रामराव राठोड, प्रा. डॉ. साहेबराव शिंदे, प्रा. डॉ. साहेबराव मोरे, प्रा. डॉ. राहुल सरोदे, प्रा. डॉ. महेश जाधव, प्रा. डॉ. शेख दुसरा, प्रा. डॉ. कपिल इंगोले आदी उपस्थित होते.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा आज विभागीय क्रीडा महोत्सव

**नांदेड (प्रतिनिधी)–** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक विभागीय केंद्राच्यावतीने गुरुवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी विभागीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ. यशवंत कलेपवार यांनी दिली.

गुरुवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडा संकुल परिसरात क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले आहे. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन मा. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. भास्कर माने, क्रीडा संचालक, स्वारातीम विद्यापीठ, नांदेड व महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सहसचिव डॉ. पवन पाटील बाराहात्ते तसेच महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनचे सन्मानयीन सदस्य डॉ. महेश वाखरडकर यांची उपस्थिती राहणार आहे. या क्रीडा महोत्सवात विविध प्रकारचे धावणे, गोळा फेक, लांब उडी, उंच उडी, थाळी फेक, कबड्डी, खो-खो, व्हॉली बॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिल, बुध्दीबळ, कुस्ती आदी सांघीक स्पर्धा होणार आहेत.

नांदेड विभागातील हिंगोली, परभणी, लातूर, नांदेड या चार जिल्ह्यातील विविध अभ्यास केंद्रातील विद्यार्थी मोठ्या सख्येने नांदेड विभागाच्या अभ्यासकेंद्रातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी या विभागीय क्रीडा महोत्सवातील विविध स्पर्धेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ. यशवंत कलेपवार यांनी केले आहे.

## क्षेत्रीय प्रकल्पातून विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक दृष्टिकोन विकसित होईल -डॉ. दीपक वाघमारे

### नेसुबो महाविद्यालयात क्षेत्रीय प्रकल्प विषयावर व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)–** नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत क्षेत्रीय प्रकल्प व प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षण हा विद्यार्थ्यांच्या ज्ञाननिर्मितीबरोबरच त्यांच्यामध्ये संशोधनात्मक दृष्टिकोन विकसित करणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून नवनवीन विषयांचा अभ्यास व संशोधन करावे, असे प्रतिपादन प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड येथील सहयोगी प्राध्यापक तथा लोकप्रशासन विभागप्रमुख प्रा. डॉ. दीपक वाघमारे यांनी केले.



अभिनव भारत शिक्षण संस्था संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाच्यावतीने बी. ए. तृतीय व एम. ए. द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी 'क्षेत्रीय प्रकल्प व प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षण' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. दीपक वाघमारे बोलत होते.

ते म्हणाले की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या निर्देशानुसार नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत क्षेत्रीय प्रकल्प व प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाचा समावेश करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली समाजोपयोगी व नाविन्यपूर्ण विषयांची निवड करून त्यांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करावा. संशोधनातून मिळणाऱ्या ज्ञानाचा लोकपयोगी वापर कसा करता येईल, याचाही विद्यार्थ्यांनी विचार करावा.

यावेळी विद्यार्थ्यांना क्षेत्रीय प्रकल्प व प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाच्या विविध पैलूंची माहिती देण्यासाठी उत्कृष्ट पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन सादर करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार कुलकर्णी होते. उपप्राचार्य प्रा. डॉ. कल्पना कदम आणि लोकप्रशासन विभागप्रमुख प्रा. अनंत कौसडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन लोकप्रशासन विभागातील प्रा. डॉ. विजय तरोडे यांनी केले.

## अनुसूचित जमातींच्या विकासासाठी श्वेतपत्रिका जाहीर करण्याची मागणी

### नांदेडमध्ये २४ सप्टेंबरपासून कोळी महादेव समाजाचे शांततामय सत्याग्रह आंदोलन सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींच्या विकासासाठी शासनाने केलेली आर्थिक तरतूद, प्रत्यक्ष खर्च, विविध योजना, लाभार्थी आणि प्रत्यक्ष मिळालेल्या लाभाची अधिकृत माहिती जनतेसमोर जाहीर करावी, तसेच अनुसूचित जमातींच्या विकासाची श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी, अशी मागणी कोळी महादेव समाजाच्या नेत्यांनी व समाज बांधवांनी केली आहे.

अनुसूचित जमातींसाठी शासनाने केलेली आर्थिक तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती जाहीर करावी, योजनांच्या लाभार्थ्यांची अधिकृत आकडेवारी जनतेसमोर आणावी, तसेच जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रक्रियेबाबत पारदर्शक आकडेवारी प्रसिद्ध करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

याशिवाय संबंधित समित्यांचे निर्णय आणि न्यायालयीन निकालांचा अधिकृत खुलासा करावा, तसेच श्वेतपत्रिका तयार करण्याची प्रक्रिया व कालमर्यादा जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## एसबीएच निवृत्त कर्मचाऱ्यांची नांदेडमध्ये संघटनात्मक बैठक; ३४ ज्येष्ठांचा सपत्नीक सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्टेट बँक ऑफ हैदराबाद निवृत्त कर्मचारी संघटनेची संघटनात्मक बैठक रविवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी येथील अंबिका मंगल कार्यालयात उत्साहात पार पडली. या बैठकीस संघटनेच्या हैदराबाद येथील केंद्रीय कार्यकारिणीचे जनरल सेक्रेटरी एम. लक्ष्मा रेड्डी, वर्किंग प्रेसिडेंट एकनाथ प्रसाद आणि माजी कोषाध्यक्ष अंजनी कुमार नोरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीच्या प्रारंभी मागील वर्षभरात निधन झालेल्या निवृत्त कर्मचाऱ्यांना उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर संघटनेच्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. प्रलंबित मागण्या, न्यायालयीन प्रकरणे, व्यवस्थापनाकडून निर्माण होणाऱ्या अडचणी तसेच त्यावर संघटनेच्या माध्यमातून करण्यात येणारे प्रयत्न याबाबत एम. लक्ष्मा रेड्डी यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

या बैठकीचे अध्यक्षस्थान मराठवाडा विभागातील निवृत्त सहायक महाप्रबंधक बुद्रुक यांनी भूषविले. एसबीएचआरईए व एसबीएच निवृत्त कर्मचारी कल्याणकारी फोरम नांदेडच्या प्रतिनिधींनी प्रमुख पाहुण्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. व्यासपीठावर फोरमचे अध्यक्ष आर. जी. जाधव, उपाध्यक्ष विजय बंगाळे, सचिव मारमपल्ले, सहसचिव इंद्रजीतसिंघ महाराज, कोषाध्यक्ष मुरलीधर गोजे यांच्यासह बीड-धाराशिवचे प्रतिनिधी प्रकाश मुळे आणि परभणी-हिंगोलीचे प्रतिनिधी अशोक मैराळ उपस्थित होते.

बैठकीचे औचित्य साधून नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली येथील अमृतमहोत्सवी वर्ष पूर्ण केलेल्या ३४ ज्येष्ठ निवृत्त कर्मचाऱ्यांचा सपत्नीक शाल, भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सेवाकाळात एसबीएचच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्पनीक सत्कार करण्यात आला.

एसबीएचचे निवृत्त कर्मचारी जयंत कोकांडकर यांच्या लेखन कार्याचेही केंद्रीय समितीच्या सदस्यांनी विशेष कौतुक करून त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्थानिक प्रतिनिधी रेणुकादास दीक्षित यांनी केले. जयंत कोकांडकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## जि. प. शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदली धोरणातील अनियमितता दूर करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदली धोरणात मोठ्या प्रमाणात अनियमितता असून, त्यामुळे सेवाज्येष्ठ शिक्षकांवर अन्याय होत असल्याचा आरोप महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समिती-संघटनेने केला आहे.

संघटनेचे राज्याध्यक्ष प्रसाद पाटील व राज्य सरचिटणीस हरीश ससनकर यांनी ग्रामविकास मंत्री आणि प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना निवेदन सादर केले आहे.

संघटनेच्या प्रमुख मागण्या अशा-टप्पा ७ रद्द करा, अवघड क्षेत्रातील बदल्यांचा ७ वा टप्पा स्थगित करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने अनेक जिल्ह्यात दिले आहेत. ५ व्या टप्प्यात सोप्या शाळा मिळतात व ७ व्या टप्प्यात सेवाज्येष्ठांना अवघड क्षेत्रात पाठवले जाते, हा मोठा अन्याय आहे. त्यामुळे टप्पा ७ रद्द करून तो संवर्ग ४ च्या टप्पा ५ मध्येच समाविष्ट करावा, संवर्ग १ व २ मध्ये सुधारणा करण्यात यावी, त्या अनुषंगाने पत्नी हयात नसलेल्या व १२ वर्षाखालील मुले असलेल्या शिक्षकांना संवर्ग १ चा लाभ द्यावा. तसेच ३० किमीच्या आत जोडीदार सेवेत असेल तर नकाराधिकार द्यावा आणि सीमेलगतच्या जिल्ह्यात किंवा अंगणवाडी सेवेत जोडीदार असेल तर पती-पत्नी एकत्रीकरणाचा (संवर्ग २) लाभ द्यावा, आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

## फसवणूक प्रकरणात ८ वर्षांपासून फरार आरोपी जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, वजिराबाद पोलिसांच्या केले स्वाधीन

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या वजिराबाद पोलीस ठाण्यातील फसवणुकीच्या गुन्ह्यात सन २०१८ पासून फरार असलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे.

नांदेड जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या गुन्ह्यांतील पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशान्वये विशेष शोध मोहीम राबविण्यात येत आहे.

दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी पोउपनि साईनाथ पुयड व त्यांचे पथक पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी नांदेड शहरात पेट्रोलिंग करत असताना खबऱ्यामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, वजिराबाद पोलीस ठाण्यातील फसवणुकीच्या गुन्ह्यातील फरार आरोपी अण्णा भाऊ साठे चौक परिसरात वावरत आहे. या माहितीच्या आधारे पथकाने सापळा रचून संशयितास शिताफीने ताब्यात घेतले.

त्याचे नाव सुरेश कामाजी शिंदे (वय ४९ वर्षे, व्यवसाय - चालक, मूळ रा. नंदनवन, ता. कंधार, जि. नांदेड, सध्या रा. अबचलनगर, खुरसाळे हॉस्पिटलजवळ, नांदेड) असे आहे.

ताब्यात घेतल्यानंतर विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने साथीदारांसह फसवणुकीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलीस अभिलेखाची पडताळणी केली असता त्याच्याविरुद्ध वजिराबाद पोलीस ठाण्यात गु.र.नं. ९२/२०१८ कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, ४७२, १२० (ब), ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल असून, तो गुन्हा केल्यापासून फरार असल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपीस पुढील कायदेशीर कारवाईसाठी वजीराबाद पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि साईनाथ पुयड व त्यांच्या पथकातील बालाजी कदम, प्रमोद जोंधळे, संदीप घोगरे, इम्रान शेख, संतोष वेल्लुरोड, रविकुमार हराळे, अमोल घेवारे यांनी पार पाडली.

## शिवा बहुजन कर्मचारी महासंघाच्यावतीने वैष्णवी जडेचा सत्कार

**नायगाव (प्रतिनिधी)–** सध्याच्या स्पर्धेच्या युगात प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मेहनत, जिद्द, चिकाटी आणि अभ्यासातील सातत्याच्या जोरावर देशातील नामांकित वैद्यकीय संस्थांमध्ये प्रवेश मिळविणाऱ्या बहुजन ओबीसी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा शिवा अखिल भारतीय वीरशैव बहुजन कर्मचारी महासंघाच्या राज्य शाखेच्या वतीने गौरव करण्यात आला. या सत्कारातून विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करण्याबरोबरच समाजातील इतर विद्यार्थ्यांनाही शिक्षणाची प्रेरणा मिळावी, हा उद्देश अधोरेखित करण्यात आला.



शिवा अखिल भारतीय वीरशैव बहुजन कर्मचारी महासंघाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष विठ्ठल ताकबिडे यांच्या पुढाकाराने हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

फॅशन|संसार|सौंदर्य

सखी

# ओठांचा गुलाबीपणा कमी होऊन काळसरपणा वाढला?

**ओठांचा रंग काळसर होण्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. मात्र, पूर्वीपेक्षा ओठांचा रंग अचानक गडद होऊ लागला असेल, तर त्यामागे अनेक कारणे असू शकतात. उन्हाचा अतिरेक, धूम्रपान, ओठांची ॲलर्जी, वारंवार ओठ चाटणे, कोरडेपणा तसेच शरीरातील संप्रेरकांमधील बदल यामुळे ओठांवर काळसर डाग किंवा रंग बदलण्याची समस्या निर्माण होऊ शकते. या समस्येला ओठांचा रंगद्रव्य वाढणे (लिप पिग्मेंटेशन) असे म्हणतात.**



## ओठांचा रंग गडद होणे नेहमीच असामान्य नसते

प्रत्येक व्यक्तीच्या ओठांचा नैसर्गिक रंग वेगळा असतो. त्वचेप्रमाणेच ओठांच्या रंगावर शरीरातील मेलॅनिन या रंगद्रव्याचा प्रभाव असतो. त्यामुळे काहींचे ओठ गुलाबी, तर काहींचे तपकिरी किंवा किंचित जांभळट-तपकिरी असू शकतात. हा नैसर्गिक रंग असू शकतो. मात्र, पूर्वी ओठांचा रंग वेगळा होता आणि अचानक तो गडद होऊ लागला, काळसर डाग दिसू लागले किंवा रंगात वेगाने बदल होऊ लागला, तर त्याकडे दुर्लक्ष करू नये.

## ओठ काळसर होण्याची प्रमुख कारणे

- उन्हाचा अतिरेक : सूर्याच्या अतिनील किरणांमुळे ओठांमधील मेलॅनिनच्या निर्मितीवर परिणाम होऊन त्यांचा रंग गडद होऊ शकतो.
- धूम्रपान आणि तंबाखू : धूम्रपानाचा परिणाम ओठांच्या त्वचेवरही होतो. त्यामुळे ओठांचा नैसर्गिक रंग बदलून काळसरपणा वाढू शकतो.
- ॲलर्जी आणि जळजळ : लिपस्टिक, लिप बाम, टूथपेस्ट किंवा त्यातील सुगंधी घटकांमुळे काही व्यक्तींना ॲलर्जी होऊ शकते. त्यामुळे ओठांवर सूज, जळजळ आणि नंतर काळसरपणा निर्माण होण्याची शक्यता असते.
- ओठांचा कोरडेपणा : शरीरात पाण्याची कमतरता किंवा सतत कोरडे हवामान यामुळे ओठ फुटू शकतात. वारंवार ओठ चाटणे, चावणे किंवा त्यावरील त्वचा खेचणे यामुळे हा त्रास आणखी वाढतो.
- संप्रेरकांमधील बदल : गर्भावस्था किंवा किशोरावस्थेत होणाऱ्या संप्रेरकांतील बदलांमुळे काही वेळा ओठांचा रंग गडद होऊ शकतो. अशा प्रकारचा बदल अनेकदा तात्पुरता असतो.
- हवामानातील बदल : उन्हाळ्यात अतिनील किरणांचा परिणाम, तर हिवाळ्यात ओठांमधील नैसर्गिक ओलावा कमी होणे यामुळे ओठांचा रंग बदलू शकतो.

## ओठांचा काळसरपणा टाळण्यासाठी काय करावे?

- ओठांना ओलावा द्या : ओठ कोरडे पडू नयेत यासाठी पेट्रोलियम जेली, सिरामाइड किंवा शिया बटर यांसारखे ओलावा टिकवून ठेवणारे घटक असलेले लिप बाम वापरता येतात. शक्यतो सुगंधरहित लिप बाम वापरणे चांगले. तसेच दिवसभर पुरेसे पाणी प्यावे.
- सूर्यकिरणांपासून संरक्षण करा : ओठांनाही सूर्याच्या अतिनील किरणांपासून संरक्षणाची गरज असते. त्यामुळे एसपीएफ ३० किंवा त्यापेक्षा अधिक संरक्षण असलेला ब्रॉड-स्पेक्ट्रम लिप बाम वापरावा. खाणे- पिणे झाल्यानंतर त्याचा पुन्हा वापर करावा.
- ओठ चाटणे, चावणे आणि त्वचा खेचणे टाळा : वारंवार ओठ चाटल्याने त्यातील नैसर्गिक ओलावा कमी होतो. ओठ चावणे किंवा फुटलेली त्वचा खेचणे यामुळे जखम, जळजळ आणि काळसरपणा वाढू शकतो.
- ॲलर्जी निर्माण करणारी उत्पादने टाळा : नवीन लिपस्टिक, लिप बाम किंवा टूथपेस्ट वापरल्यानंतर ओठांवर जळजळ, सूज किंवा रंग बदलत असल्यास त्यातील एखाद्या घटकाची ॲलर्जी असण्याची शक्यता आहे. अशा वेळी ते उत्पादन वापरणे थांबवावे.

## ‘हे’ प्रयोग टाळा...

ओठांचा रंग हलका करण्यासाठी इंटरनेट किंवा सोशल मीडियावर सांगितले जाणारे प्रत्येक घरगुती उपाय सुरक्षित असतीलच असे नाही. ओठांवर लिंबाचा रस, बेकिंग सोडा, एकाग्र स्वरूपातील सुगंधी तेल, टूथपेस्ट, साखर किंवा मीठ लावणे टाळावे. अशा पदार्थांमुळे ओठांची नाजूक त्वचा अधिक संवेदनशील होऊन जळजळ आणि काळसरपणा वाढू शकतो. त्याचप्रमाणे चेहऱ्यावरील ब्लीच, रेटिनॉलयुक्त उत्पादने, तीव्र स्वरूपाचे त्वचा घासणारे पदार्थ किंवा हायड्रोक्विनोनसारखी औषधी द्रव्ये डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय ओठांवर वापरू नयेत.



## डॉक्टरांकडे कधी जावे?

- ओठांवर अचानक गडद डाग दिसणे आणि त्याचा आकार वाढत जाणे.
- काळसरपणा अचानक सुरू होऊन वेगाने वाढणे.
- सतत खाज, जळजळ, सूज, खवले किंवा भेगा पडणे.
- ओठांवर जखम, व्रण किंवा गाठ निर्माण होणे.
- एखाद्या ठिकाणाहून वारंवार रक्तस्राव होणे आणि जखम बरी न होणे.
- ओठांचा एखादा भाग सतत खरखरीत किंवा पापुद्रायुक्त राहणे.
- ओठांच्या रंगातील बदलासोबत शरीरात इतरही असामान्य बदल जाणवणे.
- ओठांचा काळसरपणा कोणत्या कारणामुळे झाला आहे, हे तपासूनच उपचार ठरवले जातात. परिस्थितीनुसार डॉक्टर क्रीम, औषधे किंवा काही प्रकरणांमध्ये लेझर उपचार सुचवू शकतात. त्यामुळे अचानक झालेल्या रंगबदलाकडे दुर्लक्ष करण्याऐवजी योग्य वेळी त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे अधिक सुरक्षित आहे.

# सौंदर्यासाठी बॉलिवूड अभिनेत्रींचे अनोखे प्रयोग

**बॉलिवूडच्या अभिनेत्रींचे सौंदर्य पाहून त्यांच्यासारखेच सुंदर दिसावे, अशी अनेकींची इच्छा असते. त्यांची त्वचा इतकी नितळ आणि तजेलदार कशी दिसते, त्या कोणती सौंदर्यप्रसाधने वापरतात, याची उत्सुकताही असते. मात्र, महागडी सौंदर्यप्रसाधने वापरण्याबरोबरच काही अभिनेत्री घरगुती आणि काहीशा अनोख्या सौंदर्य उपायांचाही अवलंब करतात.**

## प्रत्येक सौंदर्य उपाय प्रत्येकाला योग्य असेलच असे नाही

बॉलिवूड अभिनेत्री वापरत असलेल्या या सौंदर्ययुक्त्या आकर्षक वाटत असल्या तरी त्या प्रत्येक व्यक्तीच्या त्वचेला किंवा केसांना योग्य असतीलच असे नाही. त्वचेचा प्रकार, संवेदनशीलता आणि आधीपासून असलेल्या समस्या यांचा विचार करणे महत्त्वाचे आहे. नवीन कोणताही सौंदर्यउपाय किंवा उत्पादन वापरण्यापूर्वी छोट्या भागावर पॅच टेस्ट करणे योग्य ठरते. त्वचेची गंभीर समस्या असल्यास घरगुती प्रयोग करण्याऐवजी त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे अधिक सुरक्षित आहे.

## आलिया भट्ट ते प्रियंका चोप्रा; चेहऱ्यासाठी बर्फाच्या पाण्याचा वापर



आलिया भट्टपासून प्रियंका चोप्रापर्यंत काही अभिनेत्री चेहऱ्याच्या ताजेपणासाठी बर्फाच्या पाण्याचा वापर करतात. चेहरा काही काळ बर्फाच्या पाण्यात बुडवल्याने थकवा कमी होऊन त्वचेला ताजेपणा मिळतो, असे त्यांचे म्हणणे आहे. बर्फाच्या पाण्यामुळे चेहऱ्यावरील रक्ताभिसरण सुधारण्यास मदत होऊ शकते आणि त्वचेची छिद्रे काही काळ आकुंचन पावल्यासारखी दिसू शकतात. मात्र, हा उपाय प्रत्येकाच्या त्वचेला योग्य असेलच असे नाही.

## कटरीना कैफची एकाच लिपस्टिकची अनेक कामे



कटरीना कैफ तिच्या सौंदर्यासाठी आणि मेकअप शैलीसाठी प्रसिद्ध आहे. मात्र, अनेक मेकअप उत्पादने असूनही ती एका लिपस्टिकचा विविध प्रकारे वापर करते. कटरीना लिपस्टिकचा वापर ओठांसोबतच गाल आणि डोळ्यांच्या मेकअपसाठीही करते. उदाहरणार्थ, नारिंगी रंगाची लिपस्टिक ओठांवर लावल्यानंतर त्याच रंगाचा वापर गाल आणि डोळ्यांवर करून ती व्यवस्थित मिसळला जातो. त्यामुळे संपूर्ण मेकअपमध्ये एकसंध रंगसंगती दिसते. मात्र, अशा प्रकारचा प्रयोग करण्यापूर्वी त्वचेची संवेदनशीलता लक्षात घेणे आवश्यक आहे. कोणतेही नवीन उत्पादन चेहऱ्यावर वापरण्यापूर्वी पॅच टेस्ट करणे सुरक्षित ठरते.

## मिनिमल मेकअपसाठी आलिया भट्टची साधी पद्धत



आलिया भट्टचा साधा आणि नैसर्गिक मेकअप हा तिच्या खास शैलीचा भाग मानला जातो. ती नेहमी जड फाउंडेशन वापरण्याऐवजी हलक्या मेकअपला प्राधान्य देते. ती हलका स्किन टिंट प्रायमरमध्ये मिसळून वापरते. त्यामुळे चेहऱ्यावरचा मेकअपचा थर जड दिसत नाही आणि त्वचेचा नैसर्गिक पोतही दिसून येतो. चेहऱ्यावरील प्रत्येक डाग किंवा रंगद्रव्य पूर्णपणे झाकण्याऐवजी नैसर्गिक त्वचा दिसू देणे तिला अधिक पसंत आहे. त्यामुळे रोजच्या वापरासाठी हलका आणि नैसर्गिक मेकअप तयार होतो.

## जान्हवी कपूरचा केसांच्या निगेचा देशी फॉर्म्युला

जान्हवी कपूर केसांच्या निगेसाठी महागड्या उत्पादनांऐवजी घरातील काही पदार्थांचा वापर करते. तिने एका मुलाखतीत सांगितले होते की, ती केसांसाठी अंडी, बिअर आणि मेथीसारख्या घरगुती पदार्थांचा वापर करते. केसांची निगा राखण्याच्या या पद्धती तिने आई श्रीदेवीकडून शिकल्याचेही सांगितले आहे. श्रीदेवी घरच्या घरी आवळा आणि सुक्या फुलांपासून तयार केलेले तेल केसांना लावत असत. जान्हवीही केसांना नियमित तेलाची मालिश करते. त्वचेच्या निगेसाठी ती चेहऱ्यावर मध आणि साय लावण्यासही पसंती देते.



## दाट भुवयांसाठी प्रियंका चोप्राची युक्ती



प्रियंका चोप्राच्या भुवया दाट आणि उठावदार दिसतात. भुवया अधिक दाट आणि नैसर्गिक दिसण्यासाठी ती छोट्या ब्रशच्या मदतीने भुवयांचे केस वरच्या दिशेने विंचरते. यानंतर आयब्रो डिफायनरचा (Eyebrow Definer म्हणजे भुवयांना आकार आणि उठाव देण्यासाठी वापरले जाणारे मेकअप उत्पादन) वापर करून भुवयांना योग्य आकार दिला जातो. ही पद्धत भुवया अधिक दाट आणि उठावदार दिसण्यास मदत करू शकते. भुवया विरळ असतील तर योग्य प्रकारे आयब्रो डिफायनरचा वापर करून त्यांना अधिक उठावदार रूप देता येते.

## ट्विंकल खन्नाची केसांसाठी घरगुती पद्धत

ट्विंकल खन्नाही केसांच्या निगेसाठी घरगुती उपायांचा आधार घेते. ती केसांच्या मुळांच्या त्वचेवर म्हणजेच स्कॅल्पवर दही, अंडी आणि बिअरपासून तयार केलेले मिश्रण लावते. तिची आई आणि अभिनेत्री डिंपल कपाडिया यांच्याकडूनही केसांच्या निगेसाठी अशा घरगुती उपायांचा वापर केला जात असल्याचे सांगितले जाते. केसांना बिअर कंडिशनर म्हणून वापरल्याने केसांना चमक येते, असा दावा केला जातो.



# प्रियंका चोप्रा-निक जोनस यांच्या नात्याचे गमक; वयात 10 वर्षांचे अंतर असूनही नाते कसे टिकले?

**अभिनेत्री प्रियंका चोप्रा आणि निक जोनस यांच्या विवाहाची चर्चा सुरू झाली, तेव्हा सर्वाधिक लक्ष वेधून घेणारा मुद्दा होता तो त्यांच्या वयातील फरकाचा. प्रियंका निकपेक्षा सुमारे १० वर्षांनी मोठ्या आहेत. मात्र, दोघांनीही आपल्या नात्याकडे वयाच्या चष्म्यातून पाहिले नाही. त्यांच्या वैवाहिक आयुष्यातून एक गोष्ट स्पष्ट होते : नाते टिकवण्यासाठी केवळ प्रेम पुरेसे नसते; परस्परांचा आदर, विश्वास, समजूतदारपणा आणि खंबीर साथही तितकीच महत्त्वाची असते.**

प्रियंका चोप्रा आणि निक जोनस यांची प्रेमकहाणी सुरुवातीपासूनच चर्चेचा विषय ठरली. दोघांच्या वयातील अंतरामुळे अनेक प्रकारच्या चर्चा झाल्या. मात्र, त्यांनी इतरांच्या मतांचा आपल्या नात्यावर परिणाम होऊ दिला नाही. डिसेंबर २०१८ मध्ये दोघांनी विवाह केला आणि त्यानंतरही आपापल्या क्षेत्रात सक्रिय राहून एकत्र आयुष्य पुढे नेले. त्यांच्या नात्याची खास बाब म्हणजे त्यांनी वयाला नात्याची ओळख बनू दिले नाही. एकमेकांना समजून घेणे आणि आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर साथ देणे याला त्यांनी अधिक महत्त्व दिले.



## वयातील अंतराला नात्यावर वर्चस्व गाजवू दिले नाही...

विवाहानंतरही प्रियंका आणि निक यांच्या वयातील फरकाची चर्चा होत राहिली. मात्र, त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात हा फरक मोठी अडचण ठरल्याचे दिसून आले नाही. दोघेही आपापल्या कामात व्यस्त असतात आणि अनेकदा वेगवेगळ्या ठिकाणी काम करतात. तरीही एकमेकांच्या महत्त्वाच्या प्रसंगी आणि व्यावसायिक आयुष्यात ते परस्परांना साथ देताना दिसतात. त्यांच्या नात्यातून एक महत्त्वाचा धडा मिळतो, दोन व्यक्ती एकमेकांसोबत सहज आणि आनंदी असतील तसेच आपल्या नात्याबाबत गंभीर असतील, तर वयातील अंतर गौण ठरते.



## एकमेकांच्या स्वप्नांचा आणि करिअरचा आदर

प्रियंका चित्रपटांसह आंतरराष्ट्रीय प्रकल्पांमध्ये काम करतात, तर निक संगीत क्षेत्रासह इतर व्यावसायिक कामांमध्ये व्यस्त असतो. दोघांची स्वतंत्र ओळख, आवडी आणि कामाचे क्षेत्र आहे. तरीही ते एकमेकांच्या कामाचा आणि स्वप्नांचा आदर करतात. कोणत्याही नात्यासाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. जोडीदार तुमच्या स्वप्नांना समजून घेत असेल आणि तुमच्या यशाचा मनापासून आनंद घेत असेल, तर नात्यातील अनावश्यक नाराजी आणि तुलना कमी होते. एकत्र आयुष्य जगण्याचा अर्थ प्रत्येक गोष्ट एकत्रच करणे असा नाही. उलट, एकमेकांना स्वतःची स्वप्ने पूर्ण करण्याची आणि आपल्या क्षेत्रात पुढे जाण्याची मोकळीक देणेही तितकेच आवश्यक आहे.

## प्रेमासोबत आदर अन् विश्वासही आवश्यक

प्रेम नात्याची सुरुवात करू शकते; मात्र ते नाते दीर्घकाळ टिकवण्यासाठी विश्वास आणि परस्परांचा आदर आवश्यक असतो. जोडीदाराचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकणे, त्याच्या निर्णयांचा आदर करणे आणि गरजेच्या वेळी त्याच्या पाठीशी उभे राहणे यामुळे नाते अधिक मजबूत होते. वयात फरक असो किंवा नसो, एखाद्या नात्यात एक जोडीदार दुसऱ्याला कमी लेखू लागला तर समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे वयाची तुलना करण्यापेक्षा दोघे एकमेकांना किती मान देतात आणि कठीण प्रसंगी किती ठामपणे एकमेकांच्या पाठीशी उभे राहतात, हे अधिक महत्त्वाचे आहे.

## इतरांच्या मतांपेक्षा स्वत:च्या आनंदाला महत्त्व द्या

प्रियंका आणि निक यांच्या नात्यातून सर्वांत महत्त्वाचा संदेश मिळतो तो म्हणजे, आपल्या नात्याबाबतचा निर्णय केवळ इतरांच्या मतांवर आधारित नसावा. प्रत्येक व्यक्तीचे आयुष्य आणि प्रत्येक नाते वेगळे असते. एका नात्यात योग्य ठरणारी गोष्ट दुसऱ्या नात्यातही योग्य असेलच असे नाही. जर दोन व्यक्ती एकत्र राहून आनंदी असतील, एकमेकांवर विश्वास ठेवत असतील आणि परस्परांचा आदर करत असतील, तर केवळ वयातील फरक त्यांच्या नात्याला कमकुवत करू शकत नाही. शेवटी, कोणत्याही नात्यात महत्त्वाचे असते ते म्हणजे दोघांनी मिळून आयुष्य अधिक चांगले करण्याचा प्रयत्न करणे. समाज काय म्हणतो यापेक्षा जोडीदाराच्या आनंदाला, भावनांना आणि परस्परांच्या विश्वासाला अधिक महत्त्व दिले, तर वयातील अंतरासारखे अनेक अडथळे सहजपणे दूर करता येऊ शकतात.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली 'विकसित भारत'चा संकल्प पूर्ण करू मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास!

## मोदींच्या २५ वर्षांच्या राजकीय कारकीर्दीनिमित्ताने विशेष कार्यक्रम



**मुंबई (प्रतिनिधी)** – गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून २००१ मध्ये सुरू झालेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय सेवेला बुधवारी २५ वर्षे पूर्ण झाली. मुख्यमंत्री ते पंतप्रधान असा मोदींचा २५ वर्षांचा सेवाप्रवास पूर्ण झाल्याच्या निमित्ताने महाराष्ट्र भाजपच्या वतीने बुधवारी 'सेवा संकल्प अभियानांतर्गत 'विकसित भारत २०४७' संकल्प सभा आणि 'सेवा ज्योती यात्रा'चा प्रारंभ करण्यात आला. या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोदी यांच्या २५ वर्षांच्या सेवापर्वाचे कौतुक करत २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प व्यक्त केला.

गिरगाव चौपाटीजवळील भारतीय विद्या भवन येथे झालेल्या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि कौशल्यविकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमानंतर माध्यमांशी संवाद साधताना फडणवीस यांनी मोदी यांच्या २५ वर्षांच्या राजकीय प्रवासाचा गौरव केला.

२००१ मध्ये याच दिवशी नरेंद्र मोदी यांनी गुजरातच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. त्यानंतर गुजरातचे मुख्यमंत्री आणि पुढे देशाचे पंतप्रधान म्हणून त्यांनी २५ वर्षे काम केले. हा कालखंड समर्पण, विकास आणि मानवकल्याणाचा असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. गेल्या १२ वर्षांत भारताला 'फ्रॅजाइल फाइव्ह'मधून 'टॉप फाइव्ह' अर्थव्यवस्थांमध्ये आणण्याचे काम मोदी यांच्या नेतृत्वाखाली झाल्याचा दावा त्यांनी केला. देशातील २५ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढण्याचे काम झाल्याचेही फडणवीस यांनी नमूद केले. आता २०४७ मध्ये विकसित भारत साकारण्याचा संकल्प करण्यात आला असून, तो पूर्ण करण्यासाठी 'वी विल डू इट' असा निर्धार फडणवीसांनी व्यक्त केला. महाराष्ट्राच्या वतीने फडणवीस यांनी मोदी यांना २५ वर्षांच्या सेवापूर्तीनिमित्त शुभेच्छाही दिल्या.

# रसायनशास्त्राचा नोबेल पुरस्कार जाहीर, हेन्री बी.कागन आणि केन्सो सोई यांना संयुक्त बहुमान




**मुंबई (प्रतिनिधी)** – जगभरात अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या नोबेल पुरस्कारांची घोषणा सुरू झाली आहे. यातील रसायनशास्त्र विषयातील नोबेल पुरस्काराची घोषणा बुधवारी करण्यात आली. यंदाचा रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कार फ्रान्सचे शास्त्रज्ञ हेन्री बी. कागन आणि जपानचे शास्त्रज्ञ केन्सो सोई यांना संयुक्तपणे जाहीर झाला आहे. 'नॉन लिनियर इफेक्ट्स' आणि 'स्व-उत्प्रेरण' या क्षेत्रातील त्यांच्या क्रांतीकारी शोधासाठी रॉयल स्वीडिश अकादमी ऑफ सायन्सेसकडून हा सर्वोच्च बहुमान देण्यात आला आहे.

नोबेल रसायन समितीचे अध्यक्ष हेनर लिंके यांनी या शोधाचे महत्त्व सांगताना सांगितले की, हेन्री कागन आणि केन्सो सोई यांनी रसायनशास्त्रातील सुमारे एक शतकापेक्षा अधिक काळ प्रलंबित असलेले मोठे रहस्य उलगडले आहे. निसर्गात किंवा रासायनिक प्रक्रियेत 'समरूपता' स्वतःहून कशी निर्माण होऊ शकते, याचा अचूक शोध त्यांनी लावला आहे.

या पुरस्कारातील विजेते हेन्री बी. कागन हे मूळचे फ्रान्सचे असून ते 'युनिव्हर्सिटी पेरिस-सुड' शी संबंधित आहेत. तर दुसरे विजेते केन्सो सोई हे जपानचे ९५ वर्षीय ज्येष्ठ शास्त्रज्ञ असून ते 'टोकियो युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स' येथे कार्यरत आहेत. या पुरस्काराचे स्वरूप १२ दशलक्ष स्वीडिश क्रोनर (सुमारे १० कोटी रुपये) आणि सुवर्णपदक असे असून, ही रक्कम या दोन्ही शास्त्रज्ञांमध्ये समान वाटून दिली जाणार आहे.

यंदाच्या नोबेल पुरस्कारांची सुरुवात वैद्यकशास्त्राने झाली, ज्यामध्ये मेंदूचे कार्य समजून घेण्याच्या तंत्रज्ञानासाठी तीन शास्त्रज्ञांना पुरस्कार मिळाला. मंगळवारी भौतिकशास्त्राचा पुरस्कार न्युट्रिनोच्या शोधासाठी देण्यात आला. बुधवारी रसायनशास्त्राची घोषणा झाल्यानंतर आता गुरुवारी साहित्यातील नोबेल, शुक्रवारी शांततेचा नोबेल आणि आगामी सोमवारी अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कारांची घोषणा केली जाणार आहे.

# राहुल गांधींना ताब्यात घेतल्याच्या निषेधार्थ मुंबई युवक काँग्रेसचा रास्ता रोको




**मुंबई (प्रतिनिधी)** – दिल्ली येथे निवडणूक आयोगाच्या कार्यालयात भेटीसाठी निघालेले लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि अन्य विरोधी पक्षातील नेत्यांना दिल्ली पोलिसांनी बेकायदेशीरपणे ताब्यात घेतल्याच्या निषेधार्थ मुंबई युवक काँग्रेसने वांद्रे रिक्लेमेशन येथे रात्री रास्ता रोको आंदोलन केले. मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात युवक काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

रात्री सुमारे ११ वाजता युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी वांद्रे रिक्लेमेशन येथे रास्ता रोको करत वाहतूक रोखली. यावेळी मोदी सरकार तसेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि लोकशाही संस्थांच्या स्वायत्ततेच्या मुद्द्यावर युवक काँग्रेसने आपला निषेध नोंदवला. या आंदोलनाला मुंबई युवक काँग्रेसचे सरचिटणीस तेजस चंदूरकर, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष प्रज्ञा ढवळे, अजय मिश्रा, शादाब अन्सारी, शिवा यादव, अब्दुल समद, पंकज चौधरी यांच्यासह युवक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन म्हणाल्या की, केंद्रातील आणि विविध राज्यातील भाजप सरकारे व्होट चोरी करून आलेली आहेत हे आता स्पष्ट झाले आहे. या व्होटचोरीविरोधात देशभरात संताप आहे. या जनभावनेला अनुसरून राहुल गांधी हे ३०० खासदारांसह मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांना भेटायला जात असताना पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले ही मोदी सरकारची दडपशाही आहे, आम्ही याचा निषेध करतो. मोदी सरकार जेव्हा जेव्हा राहुलजींचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करेल त्या प्रत्येकवेळी राहुलजींच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरून संघर्ष करू असे शबरीन म्हणाल्या.

दरम्यान, मुंबईतील आंदोलन दडपण्याच्या प्रयत्नात पोलिसांनी महिला युवक काँग्रेस कार्यकर्त्यांशी धक्काबुक्की व मारहाण केली तसेच काही महिला कार्यकर्त्यांना केसाला धरून ओढत पोलिस व्हॅनमध्ये फेकले. पोलिसांच्या या दडपशाहीचा मुंबई युवक काँग्रेसने निषेध केला आहे.

**पान १ वरून...**

### ज्ञानेश हटावो, लोकशाही...

माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, माधवराव पाटील जवळगावकर, रोहीदास चव्हाण, काँग्रेसचे उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, काँग्रेस महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार, प्रा. यशपाल भिंगे, सुरेश गायकवाड, डॉ. श्रावण रॅपनवाड, तिरुपती पाटील कोंडेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बबन बारसे, जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, प्रदिप नागापूरकर, तालुकाप्रमुख सुनील पाटील कदम, सतीश उमरेकर, नगरसेवक मुन्ना अब्बास, सीपीएमचे विनोद गोविंदवार, राष्ट्रवादीचे तातेराव पाटील आलेगावकर, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, महानगरप्रमुख मनोज यादव, सीपीआयचे कॉ. गंगाधर गायकवाड, अनिल मोरे, राजेश पावडे, आनंदराव गुंडिले, बालाजी गाडे, कुमार कुर्तडीकर, शिवाजी पाटील पाचपिपळेकर, नगरसेवक सत्यपाल सावंत, पाशा भाई, शोहब हुसेन, मोसिम खान, शहबाज फहिज, मो. इब्राहिम, राजू गोडबोले, महेश देशमुख तरोडेकर, गणेश ढगे, अजिज कुरेशी, मुन्तजिब, शेर अली, डॉ. बाकी, संदिप देशमुख, सुरेश हटकर, सचिन टाले, विनोद कांचनगिरे, दिपकसिंग हुजारिया, बापूसाहेब पाटील, प्रवीण कानगुले, रमेश चित्ते, अब्दुल रहिम, संजय वाघमारे, गगन यादव, उज्वला पडलवार, मीना आरसे, देशमुख मॅडम तरुणुम पठाण, ज्योती कदम, जेसिका शिंदे, नसिम पठाण, ललिता कुंभार, सुरेखा वैद्य, विमल किर्तने, वेंकोबा येडे पाटील, बालाजी पेनुरकर, अतुल पेदेवाड, शंकर शिंदे, सुरज शिंदे, अक्षय नळगे, निरंजन पावडे, नागराज सुलगेकर, विजय सोंडारे, गणेश कोकाटे, जसपालसिंघ तबेलेवाले, संजय कौठेकर, प्रीतम जोंधळे, आनंद नादरे, शेख कलिम, गोविंद पाटील, अमोल कदम खडकीकर, श्रीकांत जोंधळे, तात्याराव शिंदे, शिवाजी कदम, कालिदास कोरले, प्रल्हाद साळुंखे, बाबासाहेब देशमुख, प्रकाश दिपके, अझर शेख, आदीसह इंडिया आघाडीतील सर्वच पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकल्यानंतर शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.

### नांदेड जिल्ह्यातील शाळांना...

रोजी मंगळवारी गुरुनानक जयंतीची सार्वजनिक सुट्टी असल्याने बुधवार दि. २५ नोव्हेंबर २०२६ पासून शाळा नियमित सुरू होतील.

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाचे कार्यदिन नियोजनही यावेळी जाहीर करण्यात आले आहे.

एकूण वार्षिक दिवस ३६५ असून त्यापैकी ५२ रविवार, ५७ सार्वजनिक सुट्ट्या, जिल्हाधिकारी यांच्या अधिकारातील ३ सुट्ट्या, कार्यालयाच्या परवानगीने २ सुट्ट्या आणि दिवाळीच्या १४ सुट्ट्या (रविवार/सार्वजनिक सुट्ट्या वगळून) अशा एकूण १२८ दिवस सुट्ट्या राहणार आहेत. त्यामुळे या वर्षी अंतिम एकूण कार्यदिवस २३७ दिवस असतील.

प्रयोगशाळा सहाय्यक आणि प्रयोगशाळा परिचर वगळता इतर शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दीर्घ सुट्ट्या लागू नसल्याचेही या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र दीर्घ सुट्टीच्या काळात येणाऱ्या सार्वजनिक सुट्ट्या त्यांना लागू राहतील, असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी कळवले आहे.

### अल्-निनोच्या पार्श्वभूमीवर...

दुरुस्त करावी. शक्य त्या ठिकाणी प्रक्रिया केलेले अथवा पुनर्वापरयोग्य पाणी उद्याने, स्वच्छता, बांधकाम आणि अन्य पिण्याव्यतिरिक्त कामांसाठी वापरावे. विभागाच्या अखत्यारितील विहिरी, तलाव, टाक्या व अन्य जलस्रोतांचा अनावश्यक अथवा बेकायदेशीर उपसा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांमध्ये पाणी बचत व जलसंधारणाबाबत जनजागृती करावी. पाणीटंचाईची शक्यता, जलस्रोतांची घटती पातळी किंवा पाणीपुरवठ्याशी संबंधित गंभीर बाब निदर्शनास आल्यास ती तात्काळ जिल्हा प्रशासनाच्या निदर्शनास आणावी.

नांदेड शहर व जिल्ह्यातील बांधकाम क्षेत्राचा विस्तार लक्षात घेता बांधकामासाठी पिण्यायोग्य पाण्याचा अनावश्यक वापर टाळणे आवश्यक आहे. स्थावर संपदा विकासकांची संघटनांनी (क्रेडाई) आपल्या सभासद बांधकाम व्यावसायिक व विकासकांना पाणी वापराचे योग्य नियोजन करण्याबाबत आवश्यक सूचना द्याव्यात. बांधकाम, साफसफाई, धुलाई तसेच अन्य पिण्याव्यतिरिक्त कामांसाठी शक्य त्या ठिकाणी प्रक्रिया केलेले अथवा पुनर्वापरयोग्य पाणी वापरावे. बांधकाम प्रकल्पांमध्ये पाणीगळती रोखण्यासाठी नियमित तपासणी करावी. मोठ्या गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये पावसाचे पाणी साठवण, जलसंधारण व पाणी पुनर्वापराच्या उपाययोजना राबवाव्यात. वापरण्यात येणाऱ्या पाण्याची नोंद ठेवून अनावश्यक वापरास प्रतिबंध करावा.

जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राने जलसंवर्धन व पाणी पुनर्वापराच्या उपाययोजनांना प्राधान्य द्यावे. उद्योग संघटनांनी आपल्या सभासद उद्योगांना याबाबत आवश्यक मार्गदर्शन करून कार्यवाही करण्यास प्रवृत्त करावे.

शासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक उद्योगाने आपल्या एकूण पाणी वापरापैकी किमान ३० टक्के पाण्याचा पुनर्वापर अथवा पुनर्चक्रीकरण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना व पायाभूत सुविधा विकसित कराव्यात. ज्या औद्योगिक कामांसाठी प्रक्रिया केलेले पाणी वापरणे शक्य आहे, तेथे पिण्यायोग्य पाण्याचा वापर टाळावा.

औद्योगिक प्रक्रिया केंद्र किंवा सांडपाणी प्रक्रिया केंद्रातून उपलब्ध होणाऱ्या प्रक्रिया केलेल्या पाण्याचा औद्योगिक तसेच अन्य पिण्याव्यतिरिक्त कामांसाठी पुनर्वापर करावा. उद्योगांनी नियमित पाणी वापराचे परीक्षण करून जलसंवर्धनाच्या प्रभावी उपाययोजना राबवाव्यात.

नांदेड शहरातील बाजारपेठा, दुकाने, हॉटेल्स, उपाहारगृहे तसेच अन्य व्यावसायिक आस्थापनांनी पाणी बचतीसाठी सक्रिय सहभाग घ्यावा. व्यापारी महासंघानी आपल्या सभासदांना पाणी बचतीबाबत आवश्यक सूचना द्याव्यात. व्यावसायिक आस्थापनांमध्ये पिण्यायोग्य पाण्याचा अनावश्यक वापर टाळावा. नळ, पाईपलाईन, टाक्या व अन्य जलव्यवस्थेतील पाणीगळती तात्काळ दुरुस्त करावी. शक्य त्या ठिकाणी प्रक्रिया केलेले अथवा पुनर्वापरयोग्य पाणी स्वच्छता, धुलाई, उद्यान व अन्य पिण्याव्यतिरिक्त कामांसाठी वापरावे.

मोठ्या व्यावसायिक संकुलांनी पावसाचे पाणी साठवण, पाणी पुनर्वापर व जलसंधारणाच्या उपाययोजना राबवाव्यात. ग्राहक, कर्मचारी व व्यापाऱ्यांमध्ये पाणी बचतीबाबत जनजागृती करावी.

सद्यस्थितीत उपलब्ध जलसाठा मर्यादित असून पिण्याच्या पाण्यास सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. त्यामुळे पाणी बचत ही केवळ जनजागृतीपुरती मर्यादित न ठेवता प्रत्येक विभाग, संस्था व घटकाने आपल्या कार्यक्षेत्रात प्रत्यक्ष उपाययोजना राबवाव्यात.

१६ ऑक्टोबर २०२६ पासून पाणी वापरामध्ये किमान १० टक्के कपात करणे, पिण्यायोग्य पाण्याचा अनावश्यक वापर टाळणे, पाणीगळती तात्काळ दुरुस्त करणे, पुनर्वापरयोग्य पाण्याचा जास्तीत जास्त वापर करणे आणि जलसंधारणाच्या उपाययोजना राबविणे याबाबत संबंधितांनी तातडीने कार्यवाही करावी.

३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता अबाधित ठेवण्यासाठी प्रत्येकाने पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरावा. 'पाणी बचत हीच पाणी उपलब्धतेची हमी' या भूमिकेतून सर्व शासकीय यंत्रणा, संस्था, उद्योग, बांधकाम व्यावसायिक, व्यापारी व व्यावसायिक आस्थापना आणि नागरिकांनी जबाबदारीने कार्यवाही करावी. संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या उपाययोजनांना सर्वांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

### एमपीएससी आंदोलनाबाबत....

वर्गांमध्ये परत जाण्यास सांगितले पाहिजे. हे प्रकरण आता न्यायालयासमोर आहे आणि विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा निर्माण झाला पाहिजे. अध्यक्षांची नियुक्ती कशी केली जाऊ शकते आणि त्यांची जबाबदारी काय आहे, हे तुम्हाला माहीत आहे. ज्यांना या पदांमध्ये रस आहे, त्यांना निवड प्रक्रियेत सहभागी होण्याची समान आणि निष्पक्ष संधी मिळाली पाहिजे आणि पात्र उमेदवारांची निवड झाली पाहिजे, असंही न्यायालयाकडून सांगण्यात आलं आहे.

## Change In Name

My old name is **Ayesha Siddiqua shaikh Ayyub** which I am chang-ing as a New name **Ayesha Siddiqua** Hence forth my all cores pondence will be done as per my new hame. Please Consider the same

**Contact :- Ayesha Siddiqua**
**Address, Sameera Bagh Waghi Road, NANDED. Maharashtra-431602 M No- 9423155593**

## टी.सी. हरवली

माझी भाग्यश्री व्यंकटराव कंतेवाड या नावाची दहावी पासची टी. सी. मुखेड ते सावरमाळ प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.- **संपर्क पत्ता - मु.पो. सावरमाळ ता. मुखेड जि. नांदेड मो.नं. ९८२३७३०४२१**

## प्रमाणपत्र हरवले

माझी अभिमान संभाजी जोंधळे या नावाची बारावी (कला) पासची टी.सी., मार्कमेमो, सनद व जात प्रमाणपत्र इत्यादी लोहा ते नांदेड बस प्रवासात हरवले आहे. कोणाला सापडल्यास संपर्क साधवा.

**संपर्क पत्ता –**
**अभिमान संभाजी जोंधळे**
**रा. किरोडा पो. गोलेगाव ता. लोहा जि. नांदेड**
**मो.नं. ७६२०४१६३५८**

**जाहिरप्रगटन**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २२६/२०२६
**भारतबाई भ्र. साहेबराव कांबळे व इतर वि. निरंक**
**अर्जदार** :१. भारतबाई भ्र. साहेबराव कांबळे वय -५० वर्षे,
२.रोशन पि. साहेबराव कांबळे - (टाकळीकर) वय -२५ वर्षे
३. रोहिणी भ्र. रामदास भालेराव वय -२३ वर्षे,

अर्जदार क्र. १ व २ रा. टाकळी (थडी) ता. बिलोली जि. नांदेड
अर्जदार क्र. ३ रा. अटकळी ता. बिलोली जि. नांदेड

**विरूध्द**
निरंक
विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत **साहेबराव पि. रामा कांबळे** यांची अर्जदार क्र.१ ही पत्नी आहे. अर्जदार क्र.२ व ३ हे मुले आहेत. मयत **साहेबराव पि. रामा कांबळे** यांचा मृत्यु दिनांक **३०/०८/२०२६** रोजी झाला. मयत **साहेबराव पि. रामा कांबळे** यांचे अर्जदारा व्यतीरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत **साहेबराव पि. रामा कांबळे** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत **दिनांक १९/११/२०२६** रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/ उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि.२९ सप्टेंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर,
बिलोली

**जाहिरप्रगटन**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २१५/२०२६
**जिजाबाई भ्र. शंकर भालेराव व इतर वि. निरंक**
**अर्जदार** :१. जिजाबाई भ्र. शंकर भालेराव वय - ६४ वर्षे,
२. आबाजी पि. शंकर भालेराव वय -४६ वर्षे
३. गौतम पि. शंकर भालेराव वय -४३ वर्षे,
४. संजय पि. शंकर भालेराव वय -३६ वर्षे,
५. सत्यप्रकाश पि. शंकर भालेराव वय -३० वर्षे,
६. रमाबाई गौतम पि. शंकर भालेराव वय -४५ वर्षे,

अर्जदार क्र. १ ते ५ रा. हिप्परगा थडी ता. बिलोली जि. नांदेड
अर्जदार क्र. ६ रा. चिटमोगरा ता. बिलोली जि. नांदेड

**विरूध्द**
निरंक
विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत **शंकर महादू भालेराव** यांची अर्जदार क्र.१ ही पत्नी आहे. अर्जदार क्र.२ ते ६ हे मुले आहेत. मयत **शंकर महादू भालेराव** यांचा मृत्यु दिनांक **२५/०२/२०२४** रोजी झाला. मयत **शंकर महादू भालेराव** यांचे अर्जदारा व्यतीरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत **शंकर महादू भालेराव** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत **दिनांक १७/११/२०२६** रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/ उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि.२९ सप्टेंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर,
बिलोली

## Change In Name

My old Name is **MOHAMMAD LAEEQUE SIDDIQUI MOHAMMAD SIDDIQUI** Which now I am Changing as New Name **MOHAMMED LAIQUE MOHAMMED SIDDIQUE SIDDIQUI** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**Address: H.NO.1-23-16/2, PLOT NO.15, BAPU NAGAR, TARODA BK, NANDED-431605 Mob: 9552610172**

**जाहीर प्रगटन**
संचिका क्रं. NT/01/15232/क्षे.का.क्रं.1 तरोडा-सांगवी
**प्रकरण: - नाव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या अधारे सर्व जनतेस कळविण्यात येते श्री/सौ चंद्रकांत लालबाजी गायकवाड रा. तरोडा खु. नांदेड या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ. पत्र क्रं. 1051/09 दि.30/10/2009 तरोडा खु. गट नं. 130 पैकी प्लॉट क्रं. 41 व 50 वरील फ्लॅट नं. 202 पिन क्र. 40103074022 श्री/सौ. नागोराव बापुराव साळुंके व इतर यांच्या नावे असलेली मालमत्ता यांचेकडुन अर्ज खरेदीखत क्रं. 3508 दि.02.04.2025 च्या आधारे विकत घेतली आहे / वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आ-कारणी नोंद वहीत घेण्यासाठी जाहिरप्रगटन देण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून (15) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमत्ता नोंदविण्यात येईल.

चतु:सिमा :-
पुर्व :- पॅसेज व फ्लॅट नं. 202 आहे.
पश्चिम :- 20 फुट रुंद रोड आहे.
दक्षीण :- फ्लॅट नं. 201 व डक्ट आहे.
उतर :- फ्लॅट नं. 203 आहे.

सहाय्यक आयुक्त
क्षे.का.क्रं.01 तरोडा सांगवी,
नांदेड वाघाळा शहर महानरलिका,नांदेड

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# हदगाव-माहूरमध्ये जिल्हाधिकारी-सीईओंचा संयुक्त दौरा

## शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत व विकासकामांची पाहणी; दुष्काळी उपाययोजनांचा आढावा



**नांदेड (प्रतिनिधी)**- जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी हदगाव व माहूर तालुक्याचा संयुक्त दौरा करून शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत, आरोग्य तपासणी शिबीर तसेच विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ व शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

हदगाव तालुक्यातील पळसा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला आकस्मिक भेट दिली असता, रजेचा अर्ज उपलब्ध नसताना तीन शिक्षक गैरहजर असल्याचे निदर्शनास आले. याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शाळा व वर्गखोल्यांसह अंगणवाडी परिसरात नियमित स्वच्छता राखण्याचे निर्देशही देण्यात आले. जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा घेतला. तसेच पालक व ग्रामस्थांशी चर्चा केली. अंगणवाडीच्या पाहणीदरम्यान बालकांचे वेळेत वजन घेणे आणि त्यांना सकस आहार उपलब्ध करून देण्याच्या सूचना करण्यात आल्या.

माहूर तालुक्यातील मालवाडा येथे पीक कापणी प्रयोगाची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात आला. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतीविषयक अडचणी जाणून घेत विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जलतारा कामाचा शुभारंभ करण्यात आला. पाण्याचे संवर्धन व जलसाठ्यात वाढ करण्यासाठी जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन करण्यात आले.

लखमापूर येथे आयोजित आरोग्य तपासणी शिबिराला भेट देऊन नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांचा आढावा घेण्यात आला. नियमित आरोग्य तपासणी करण्यासोबतच हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढविण्यासाठी आवश्यक आहार व आरोग्यविषयक काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. लखमापूर ग्रामपंचायतीला भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधताना दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणी संवर्धन, जलसंधारण व रोजगारनिर्मितीसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. तसेच लखमापूर येथील जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती घेतली व पालकांशी संवाद साधला.

शारदीय नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रेणुका माता देवस्थान येथेही पाहणी करण्यात आली. भाविकांची सुरक्षितता, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था तसेच आवश्यक सोयी-सुविधांबाबत संबंधित यंत्रणांनी केलेल्या तयारीचा आढावा घेऊन आवश्यक सूचना देण्यात आल्या.

यानंतर माहूर पंचायत समिती सभागृहात तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत रोजगारनिर्मिती, जलसंधारण, पाणी संवर्धन, शेतकऱ्यांना रोजगार हमी योजनेचा लाभ तसेच दुष्काळी उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. शेतकऱ्यांच्या कर्जविषयक अडचणी, बँकांशी संबंधित प्रश्न तसेच बचत गटांच्या विविध बाबींवरही चर्चा करण्यात आली.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त नांदेडमध्ये 'सेवा ज्योती यात्रा' बाईक रॅली

## खा. अशोकराव चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती; शेकडो कार्यकर्त्यांचा सहभाग



**नांदेड (प्रतिनिधी)** - देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २५ वर्षे अखंडपणे केलेल्या जनसेवेचे औचित्य साधत, त्यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त भाजप महानगर व भाजप युवा मोर्चाच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी नांदेडमध्ये 'सेवा संकल्प अभियाना' अंतर्गत 'सेवा ज्योती यात्रा', 'विकसित भारत संकल्प सभा' आणि बाईक रॅलीचे आयोजन केले होते.

व्ही.आय.पी. रोडवरील कुसुम सभागृह येथे सकाळी ९:१५ वाजता दीपप्रज्वलन, 'वंदे मातरम्' आणि 'महाराष्ट्र गीता'ने सभेचा शुभारंभ झाला. त्यानंतर विविध सरकारी योजनांच्या लाभार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते जाहीर सन्मान करण्यात आला. सभेच्या प्रास्ताविकात भाजप जिल्हाध्यक्ष आमदार अमरनाथ राजूरकर यांनी अभियानाची पार्श्वभूमी स्पष्ट केली.

या प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील २५ वर्षांच्या सेवाकार्याचा गौरव केला. यानंतर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या थेट मार्गदर्शनानंतर उपस्थितांनी 'विकसित भारत २०४७' अंतर्गत सामूहिक शपथ घेतली. सकाळी ११ वाजता प्रमुख अतिथींच्या हस्ते 'सेवा ज्योती' प्रज्वलित करण्यात आली. त्यानंतर ११:१० वाजता कुसुम सभागृहापासून मोटारसायकल रॅलीला प्रारंभ झाला. ही रॅली डॉ. शंकरराव चव्हाण पुतळा, अण्णाभाऊ साठे पुतळा, वसंतराव नाईक पुतळा, आनंदनगर, भाग्यनगर, वर्कशॉप कॉर्नर, आयटीआय, शिवाजीनगर, कला मंदिर, एसपी ऑफिस आणि छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व महात्मा गांधी पुतळा मार्गे जात जुना मोंढा टॉवर येथे विसर्जित करण्यात आली.

यावेळी चैतन्यबापू देशमुख, माजी मंत्री डी. पी. सावंत, महापौर कविता मुळे, युवती प्रमुख शांभवी साले, ज्योती कल्याणकर, विजय येवनकर, शितल खांडील, दिलीप ठाकूर, विजय गंभीरे, सुषमा थोरात, प्रवीण साले, डॉ. आशुतोष राजूरकर यांची उपस्थिती होती.

# किनवटमधील अपहाराच्या रकमेत आणखी वाढ; आरोपींच्या जामिनाला पोलिसांचा विरोध

**किनवट (प्रतिनिधी)** -येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या शासकीय निधीतील कथित साडेसोळा कोटींच्या अपहारप्रकरणी अटक करण्यात आलेल्या ६ आरोपींच्या जामिनाला आर्थिक गुन्हे शाखेने विरोध केला आहे. यासंदर्भात आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी बुधवार, दि. ७ रोजी किनवट प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात अहवाल सादर केला आहे.

किनवटच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात दि. १ एप्रिल २०२४ ते १६ सप्टेंबर २०२६ या २८० शासकीय धनादेशांद्वारे १६ कोटी ३७ लाख ६६ हजार ९१२ रुपये १०३ खासगी व्यक्तींच्या खात्यांत वळविण्यात आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. या व्यवहारांची कार्यालयीन चेक रजिस्टर, कॅशबुक किंवा संबंधित देयक-व्हॉउचरमध्ये नोंद नसल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

**महाघोटाळ्यात आणखी १ कोटी ८ लाखांची भर**

प्रथमदर्शनी आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या विविध खात्यांतून सुमारे १६ कोटी ३७ लाख ६६ हजार ९१२ रुपयांचा घोटाळा झाल्याचे उघड झाले होते. तपासादरम्यान सन २०२३-२४ या कालावधीतील आणखी १ कोटी ८ लाख ४० हजार २ रुपये अनोंदित व्यवहार आढळल्याचे अहवालात नमूद आहे. याशिवाय ॲक्सिस बँकेतील विशेष केंद्रीय सहाय्य योजनेच्या खात्यातून २९ लाख ५२ हजार ८७० रुपये वळविल्याचे तपासात समोर आल्याचे सांगण्यात आले.

**आरोपींच्या खात्यांवर लाखोंच्या रकमा**

पोलिसांच्या अहवालात आरोपींच्या बँक खात्यांतील व्यवहारांचाही उल्लेख आहे. आरोपी संतोष भडंगे यांच्या नावावर २०२६ मध्ये विविध तारखांना ५.७५ लाखांपासून १० कोटी ७ लाख रुपयांपर्यंतच्या अनेक रकमा, तर निरंजन मिरासे यांच्या खात्यावर ५.५० ते १० कोटी ३ लाख रुपयांपर्यंतच्या रकमा जमा झाल्याचे नमूद आहे.

आरोपी हरीष माहुरकर यांच्या कुटुंबियांच्या खात्यांवरही विविध तारखांना सुमारे २९ लाख रुपयांच्या रकमा जमा झाल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. गोविंद अन्नपूर्णे यांच्या नावावरही दोन व्यवहारांतून सुमारे ११.७१ लाख रुपये जमा झाल्याचे अहवालात नमूद आहे.

# महाज्योती-बार्टीच्या परीक्षेत मोठा गोंधळ; ब्लॅकलिस्टेड सेंटरलाच पुन्हा परवानगी? विद्यार्थ्यांमध्ये नाराजी



**नांदेड (प्रतिनिधी)** - नांदेडमध्ये बुधवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी महाज्योती आणि बार्टी अंतर्गत घेण्यात येणाऱ्या संयुक्त गट-ब आणि गट-क परीक्षेदरम्यान मोठा गोंधळ उडाला.

नांदेड शहरालगत असलेल्या मराठवाडा इकरा इंटरनॅशनल स्कूल या परीक्षा केंद्रावर अनेक विद्यार्थ्यांचे लॉगिनच झाले नाही. त्यामुळे ऑनलाईन परीक्षा प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला.

विशेष म्हणजे हे परीक्षा केंद्र यापूर्वी ब्लॅकलिस्ट करण्यात आले होते. मात्र नाव बदलून पुन्हा याच ठिकाणी केंद्र देण्यात आल्याचा गंभीर आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. आज दिवसभरात तीन पेपर होणार होते, मात्र सकाळच्या पहिल्याच पेपरला तांत्रिक अडथळा आल्याने दिवसभरातील तिन्ही सत्रांच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या. ठराविक वेळेत लॉगिन न झाल्याने विद्यार्थ्यांचा बराच वेळ वाया गेला.

**परीक्षा रद्दची माहिती न दिल्याने गोंधळ**

एमपीएससी अंतर्गत महाज्योती आणि बार्टीची ही परीक्षा नांदेड शहरातील मराठवाडा ऑनलाईन सेंटरवर घेण्यात आली होती. लॉगिन होत नसल्याने प्रशासनाने परीक्षा रद्द केली, मात्र याची माहिती विद्यार्थ्यांना वेळेवर न दिल्याने विद्यार्थी आक्रमक झाले असून, त्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

# सोमेश्वर शिवारात बेकायदा रेतीसाठा जप्त; लिंबगाव पोलिसांची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)**- जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेदरम्यान लिंबगाव पोलिसांनी सोमेश्वर शिवारात कारवाई करून १ लाख ५० हजार रुपये किंमतीची ३० ब्रास रेती जप्त केली आहे.

दि. ६ ऑक्टोबर रोजी प्रभारी अधिकारी सपोनि पंढरीनाथ बोधनकर व त्यांचे पथक हद्दीत गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली की, सोमेश्वर शेतशिवारात गोदावरी नदीच्या ब्रिजजवळ अवैधरित्या रेती उत्खनन करून साठा करण्यात आला आहे.

माहितीच्या आधारे पथकाने घटनास्थळी पाहणी केली असता तेथे अंदाजे ३० ब्रास रेती अवैधरित्या साठवलेली आढळून आली. पोलिसांनी पंचनामा करून दीड लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी आरोपी सतीश प्रभू बोकारे (रा. सोमेश्वर, ता. जि. नांदेड) यांच्याविरुद्ध लिंबगाव पोलीस ठाण्यात गु.र.नं. १५०/२०२६, कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिता २०२३ सह कलम ४८ (७) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# ई-पीक पाहणीचे काम १५ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करा -तहसीलदार वारकड

**नांदेड (प्रतिनिधी)** -नांदेड तालुक्यात खरीप हंगामातील पिकांची अचूक नोंद घेण्यासाठी सुरू असलेले सेंट्रल डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत ई-पीक पाहणीचे काम १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत शंभर टक्के पूर्ण करावे, असे निर्देश तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी संजय वारकड यांनी दिले आहेत.

नियुक्त सर्वेअर, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) व मंडळ अधिकाऱ्यांच्या कामाचा आढावा नियोजन भवन येथे घेण्यात आला. यावेळी प्रत्यक्ष शेतावर जाऊन उभ्या पिकांची पाहणी करून त्याची नोंद सेंट्रल डिजिटल क्रॉप सर्वे ॲपवर करण्याच्या कामाला गती देण्याच्या सूचना तहसीलदारांनी दिल्या.

सर्वेअर व तलाठ्यांनी परस्पर समन्वयाने काम करावे. मंडळ अधिकाऱ्यांनी प्रभावी नियोजन व संनियंत्रण करून निर्धारित मुदतीत काम पूर्ण होईल, याची दक्षता घ्यावी, असेही निर्देश देण्यात आले.

ई-पीक पाहणीमुळे पिकांची अधिकृत नोंद उपलब्ध होऊन पीक विमा, नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाई तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे. शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी करून घेण्यासाठी नियुक्त सर्वेअर व तलाठ्यांना आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार संजय वारकड यांनी केले आहे.

या बैठकीस तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल, नायब तहसीलदार सुनिल माचेवाड व नायब तहसीलदार स्वप्नील दिगलवार तसेच तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी, ग्राममहसूल अधिकारी (तलाठी) व सर्वेअर (सहायक) उपस्थित होते.

# विद्यापीठात एकीकडे शुल्कमाफी तर दुसरीकडे बॅकलॉग शुल्क



**नांदेड (प्रतिनिधी)**- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या हद्दीतील दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत विद्यापीठाने परिपत्रक जारी केले असतानाही काही महाविद्यालयांकडून बॅकलॉग परीक्षेसाठी विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारले जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने केला आहे.

विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार संबंधित दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांकडून परीक्षा अर्ज परीक्षा शुल्काशिवाय स्वीकारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, काही महाविद्यालयांमध्ये बॅकलॉग परीक्षेचे शुल्क विद्यार्थ्यांकडून घेतले जात आहे. याबाबत महाविद्यालय प्रशासनाकडे विचारणा केली असता, विद्यापीठाने बॅकलॉग परीक्षेचे पैसे घेण्यास सांगितले आहे, असे उत्तर दिले जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या प्रकारामुळे विद्यापीठाच्या परिपत्रकाची अंमलबजावणी नेमकी कशी केली जात आहे, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने बॅकलॉग परीक्षेच्या शुल्काबाबत तात्काळ स्पष्ट आदेश जारी करावेत, तसेच दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारले जात असल्यास ते त्वरित थांबवून त्यांना शुल्कमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे नांदेड जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दीकी यांनी कुलगुरूंकडे निवेदनाद्वारे केली आहे.

विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून विद्यापीठ प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी. शुल्क आकारणी त्वरित थांबवून विद्यार्थ्यांना दिलासा न दिल्यास राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा फैसल सिद्दीकी यांनी दिला आहे. यावेळी निवेदन देताना अमितसिंघ सुखमणी, सय्यद नावेद, चंदू ठाकूर, मोहसीन खान, शेख मेहराज, निखिल गायकवाड इत्यादी उपस्थित होते.

# स्कूलबस, व्हॅन संघटनेच्या गांधीगिरी आंदोलनाला यश -निखिल लातूरकर



**नांदेड (प्रतिनिधी)**- विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन याला सर्वोच्च प्राधान्य देत स्कूल बस व व्हॅनचालक-मालकांनी परिवहन विभागाशी सुसंवाद साधावा. नियमांच्या चौकटीत राहून आवश्यक ते सहकार्य करण्याची विभागाची भूमिका असून, चालक-मालकांच्या कायदेशीर अडचणी संवादातून आणि कायदेशीर मार्गाने सोडविल्या जातील, असे प्रतिपादन प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत साळी यांनी केले.

स्कूल बसवरील दंडात्मक कारवाईच्या पार्श्वभूमीवर परिवहन विभाग आणि स्कूल बस चालक-मालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. यावेळी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत कंकरेजा, अजित बोरकर, परिवहन निरीक्षक मंगेश गवारे, अनुश्री केंद्रे, प्रदीप ननवरे, अमित देऊळकर, कोमल रणमोडे, संघटनेचे जिल्हाध्यक्ष निखिल लातूरकर यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज ब्रिगेड महाराष्ट्र अध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव उपस्थित होते.

यावेळी स्कूलबस व्हॅन चालक-मालक संघटनेच्या वतीने १५० हून अधिक पुष्पहार घालून परिवहन अधिकाऱ्यांचे गांधीगिरी करत स्वागत करण्यात आले.

यावेळी निखिल लातूरकर यांनी वाहनांची कागदपत्रे पूर्ण करण्यासाठी वाजवी मुदत देण्याची मागणी केली. कागदपत्रांची तपासणी किंवा नियमभंगाबद्दल दंडात्मक कारवाईला संघटनेचा विरोध नसल्याचे स्पष्ट करत, प्रथम सूचना देऊन आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी वेळ द्यावा, अशी भूमिका लातूरकर यांनी मांडली. तसेच स्कूल बसच्या फिटनेस तपासणीसाठी स्वतंत्र रांग किंवा स्वतंत्र वेळ उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. तसेच स्कूलबसच्या किंवा व्हॅनच्या फिटनेस करण्यासाठी सुट्टीच्या दिवशी किंवा रविवारी तपासणी करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी करण्यात आली.

# श्रीराम सावंत यांचे निधन



**उमरी (प्रतिनिधी)**- वारकरी संप्रदायाचे सदस्य तथा ज्येष्ठ नागरिक श्रीराम गोविंदराव सावंत गोरठेकर यांचे ६ ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ८० वर्षांचे होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगी, १ मुलगा, सून, नातू, १ भाऊ असा परिवार आहे. गोरठा ता. उमरी येथे त्यांच्या पार्थिवावर ७ ऑक्टोबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रसिद्ध साहित्यिक कवी, लेखक डॉ. सुरेश सावंत यांचे बंधू तर दिगांबर पाटील सावंत यांचे ते वडील होत.

# महाराष्ट्र शासनातर्फे कवी माधव चुकेवाड यांच्या दोन पुस्तकांची निवड



**नांदेड (प्रतिनिधी)**- महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचालनालयातर्फे ग्रंथ निवड समितीने २०२४ मध्ये प्रकाशित उत्तम, दर्जेदार ग्रंथांची यादी जाहीर केली असून यात नांदेड येथील प्रसिद्ध बालसाहित्यिक माधव चुकेवाड यांच्या दोन पुस्तकांची निवड झाली आहे.

बालकवी माधव चुकेवाड यांची आतापर्यंत १८ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. बालकांवर सुसंस्कार व्हावेत, मनोरंजनही व्हावे आणि उद्याची पिढी संस्कारयुक्त घडावी हा ध्यास घेऊन माधव चुकेवाड हे सातत्याने लेखन करीत असतात. त्यांची नांदेडच्या इसाप प्रकाशनाने 'वाचू गाऊ नाचू आनंदे' हा सप्तरंगी बालकवितासंग्रह व 'श्री संतकवी दासगणु महाराज' हे बालकांसाठी चरित्र अशी दोन पुस्तके प्रकाशित केली होती. या दोन्ही पुस्तकांची निवड महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय निवड समितीने केली आहे.

आय. एस. बी. एन. नंबर असलेली तसेच उत्तम साहित्य, सकारात्मक विचार करायला शिकविणारी आणि व्यक्तिमत्त्व विकासाला मदत करणारी पुस्तके वाचकांना मिळावीत यासाठी या पुस्तकांची निवड करण्यात आलेली आहे.

# पांडुरंग कदम यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** - लोहा तालुक्यातील वाळकी (खुर्द) येथील रहिवासी पांडुरंग रामजी कदम यांचे बुधवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि. ७ ऑक्टोबर रोजी दुपारी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले,

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार असून ते येथील शेतकरी विकास, सुधाकर कदम यांचे वडील होत.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com